# श्रीशिक्षाष्टक

## [श्रीचैतन्य चैतन्यमहाप्रभूंच्या श्रीमुखनिःसृत]

## श्री गौडीय वेदांत समिती

## श्रीगुरुगौरांगौ जयतः

# श्रीशिक्षाष्टक

## [श्री चैतन्य महाप्रभुंच्या श्रीमुखनिःसृत[1]]

मूळ श्लोक, अन्वय, ~~श्लोकार्थ~~ (श्लोकांचा अर्थ), श्री सच्चिदानंद भक्तिविनोद ठाकूरकृत सन्मोदन-भाष्य, सन्मोदन भाष्याचा अनुवाद, श्रीचैतन्यचरितामृतातील उद्धृत[2] पद्यानुवाद आणि श्रीलभक्तिविनोद ठाकुरकृत कीर्तनपद

* * *

श्री गौडीय वेदांत समिती आणि तदंतर्गत भारतव्यापी
श्री गौडीय मठांचे प्रतिष्ठाता, श्रीकृष्ण चैतन्याम्नाय
दशमाधस्तनवर श्रीगौडीयाचार्यकेशरी ॐविष्णुपाद
अष्टोत्तरशतश्री
श्रीमद्भक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी चरणांचे अनुगृहित
त्रिदण्डिस्वामी श्रीमद्भक्तिवेदांत नारायण महाराज
द्वारा अनुवादित आणि संपादित

* * *

1 श्री मुखातून निघालेले/उद्गारित

2 Please find an appropriate easier Marathi word here.

(सर्वाधिकार सुरक्षित)

## मूळ हिंदी आवृत्तिची प्रस्तावना

श्रीगौडीय वैष्णव साहित्यातच नाही तर, श्रुती, स्मृती, पुराण आदि समग्र भारतीय वाङमयात श्रीचैतन्य महाप्रभुंच्या श्रीमुख-विगलित ‘श्रीशिक्षाष्टक’ एक परमोज्ज्वल दिव्यरत्न आहे. मदीय परमाराध्य श्रीश्रीगुरुदेव-नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत श्री श्रीमद्भक्तिप्रज्ञानकेशव गोस्वामी महाराजांच्या अहैतुकी कृपेमुळे आणि प्रेरणेने आज या श्रीशिक्षाष्टकाचे विभिन्न भाषांतून अनुवाद करुन ते प्रथमच वाचकांच्या समक्ष प्रस्तुत करतांना मला अपार हर्ष होत आहे. कलियुग पावनावतारी श्रीचैतन्य महाप्रभू स्वयं-भगवान् श्रीकृष्णच आहेत. व्रजेंद्रनंदन श्रीकृष्णानेच कुठल्यातरी विशेष अशा रसास्वादनाच्या लोभाने आपली ल्हादिनी शक्ती श्रीमती राधिकाजींचे[3] हृद्गत[4] भाव आणि अंगकांती धारण करुन अनर्पितचर[5] कृष्णनाम आणि कृष्णप्रेमाची दिव्य भेट समग्र विश्वास[6] प्रदान केली आहे. त्यांनी आपल्या प्रगाढतम[7] पांडित्यप्रतिभेने, अनुपम त्यागाने, विनम्र स्वभावाने, परम-उज्ज्वल[8] निर्मळ चरित्राने तथा सर्वोपरि[9] अलौकिक आणि अश्रुतपूर्व[10] भक्तिभावाने ~~त~~जसे प्रख्यात दिग्विजयी पंडितांना आणि विद्वज्जनांना चमत्कृत केले होते, तसेच धर्मप्राण[11] साधारण

---

3 मराठीत आपल्याला "जी" वापराव लागेल का?

4 हृदयातील???

5 जे बऱ्याच काळापासून दिले नव्हते,

6 "विश्वास" पेक्षा "विश्वाला" बरे आणि सरळ वाटते???

7 अत्यंत गंभीर

8 परमोज्ज्वल??

9 . सर्वश्रेष्ठ

10 जे कधीही पूर्वी ऐकले नाही ते

11 धर्म ज्यांना प्राणा इतका प्रिय आहे असे धर्मप्रिय जन

जनता आणि भावूक[12] भक्तांना देखील प्रेमधर्माकडे सहजरुपाने[13] आकृष्ट केले होते.

केवळ श्रीचैतन्य महाप्रभूच नाही, तर त्यांचे अनुगामी श्रीस्वरुप_दामोदर, रायरामानंद ~~तथ~~आणि सहा गोस्वामीपासून वर्तमान आचार्य आणि भक्तजनां~~चे~~तदेखील उक्त[14] विशिष्ट आणि महान गुणां आढळतात. त्या गुणांनमुळेच कानाकोपऱ्यात, नगरानगरात, तसेच गावागावांत भगवद्भक्तिचा प्रचार-प्रसार झाला आहे. सर्वत्र मृदुंग[15] करतालयुक्त[16] हरि-संकीर्तनाचा आवाज घुमतो[17] आहे. आज श्रीगौडीय वैष्णवांचे विश्वातल्या प्रधान भाषांत[18] पसरलेले विशाल साहित्य आणि प्रचार-प्रसार वास्तविक आपल्याकरिता महान गौरवाचा आणि आनंदाचा विषय आहे. परंतू तरीही ही परम आश्चर्याची गोष्ट आहे की सर्वसमर्थ असूनसुद्धा श्रीचैतन्यमहाप्रभूंनी ~~अन्यतम~~ इतर मत प्रवर्तन (प्रचलन, प्रचार??) करण्याऱ्या ~~प्रवर्त्तक~~ आचार्यांप्रमाणे स्वयं कुठलेही ग्रंथ आदी लिहीले नाहीत, उलटपक्षी अनुयायांद्वारेच लिहविले. त्यांच्याद्वारा स्वरचित[19] आठ श्लोकच प्रसिद्ध आहेत. आणखीदेखील काही श्लोक त्यांच्याद्वारे रचले आहेत असे म्हटले जाते, परंतू ते अजूनही प्रमाणसापेक्ष आहेत.[20]

हे शिक्षाष्टक संपूर्ण वेदांचे सारस्वरुप आहे. ~~यातील~~याची संस्कृत-भाषा अत्यंत सहज-सर~~ल~~ळ ~~होऊन~~असली~~सुद्धा~~तरी ~~यातील~~याचा आशय इतका गंभीर आहे की आजीवन याचे अनुशीलन करुनसुद्धा याचा अंत सापडत नाही. वाचून आणि विचार ~~करून~~केल्यावर प्रत्येकवेळी नवनवीन भावांची स्फूर्ति होत रहाते.

---

12 जे भक्त भाव अथवा रति अवस्थेत पोहोचले आहेत ते.

13 सहजच

14 वर सांगितलेले

15 मृदुंग?

16 टाळयुक्त? करताल पेक्षा टाळ हा शब्द जास्ती प्रचलित आहे.

17 *गुंजतो* पण चालेल..

18 This was missing in Marathi translation, I added from Hindi.

19 स्वत: रचलेले

20 अर्थात ते सिध्द करण्यासाठी सबळ प्रमाणांची आवश्यकता आहे. अर्थात हे तथ्य प्रमाणांवर अवलंबून आहे.

Formatted
Formatted
Formatted
Formatted
Formatted
Formatted
Formatted

म्हणूनच हे नित्यनवीन रहाते. अतः हे शिक्षाष्टक गौडीय वैष्णवांकरीता कंठहारस्वरुप (गळ्यातील हारासारखे) आहे.

श्रीचैतन्यमहाप्रभूंचे परिकर[21], आधुनिक युगात भक्तिभागीरथीस[22] पुनः प्रवाहित करुन विश्वाला प्रेमप्लावित[23] करविणारे, बऱ्याच भक्तिग्रंथांचे रचयिता श्रीभक्तिविनोद ठाकुरजींनी[24] या समस्त श्लोकांचे एक सुसिद्धांतपूर्ण[25] तसेच मर्मस्पर्शी भाष्य[26] लिहीले आहे. हे भाष्य ‘श्रीसन्मोदनभाष्य’ या नावाने प्रसिद्ध आहे. या भाष्याच्या अनुशीलना (पालन) केल्याशिवाय ~~बीना~~ मूळ श्लोकातील निगूढ तत्वे समजणे कठिणच नाही तर दुरापास्त ~~आणि~~ किंवा असंभव आहे. या हृदयग्राही[27] भाष्याच्या आधारे या श्लोकातील लपलेल्या प्रेमावतार श्रीशचिनंदन गौरहरिंच्या हृद्गत्-परमोन्नत, उज्ज्वल प्रेमरसपूर्ण सर्वोच्च भावांचे अवलोकन केल्यानंतर पदोपदी आश्चर्यचकित व्हावे लागते; हृदय अप्राकृत आनंदविभोर होऊन जाते आणि श्रीकृष्णनामाप्रति अभूतपूर्व श्रद्धा आणि भक्तिभावाचा संचार होतो. यांचा महिमा अनंत आहे. हे स्वयं महामहिम आहे. या विषयावर स्वयं भाष्यकाराने[28] संक्षिप्तरुपात[29] परंतू महत्वपूर्ण असा प्रकाश टाकला आहे. ~~अतः~~ म्हणून काही अधिक लिहीणे म्हणजे सूर्याला दीपक दाखविण्यासारखे आहे.

---

21 साथी (जवळचा सहायक व सेवक )

22 भक्तिरूपी गंगा नदी

23 प्रेमाद्वारे निमग्न करणारे

24 (ठाकुरांनी)

25 उत्तम सिद्धांतांने परिपूर्ण

26 टीका

27 हृदय आकर्षित करणाऱ्या

28 टीकाकाराने??

29 थोडक्यात

श्रीशिक्षाष्टकात संबंध, अभिधेय (साधन) आणि प्रयोजन (साध्य) या तत्वांचा सुंदर रुपाने समावेश केलेला आहे. तसं बघायला गेलं तर आठ श्लोकांत अभिधेय (साधन) तत्वाची शिक्षा (शिकवण) निहीत[30] आहे. तरीही प्रथम पाच श्लोकांमध्ये साधनभक्ती, सहाव्या आणि सातव्या श्लोकांत भावभक्ती आणि ~~सातव्या व आठव्या श्लोकात भावभक्ति आणि~~ सातव्या व आठव्या श्लोकांत प्रेमा-भक्ति परिस्फुटीत[31] आहे. विशेषतः सातव्या आणि आठव्या श्लोकांत श्रीमती राधिकाजींच्या निजस्व[32] अधिरुढ महाभावांच्या अंतर्गत विप्रलंभ (विरहात्मक) भावा~~त्मक~~ने परिपूर्ण असलेल्या प्रेम-वैचि~~त्र्य~~त्या~~का~~चे (हिंदी आवृत्ती में "प्रेमवैचित्त्य" लिखा है?[33]) अत्त्युच्च्य निदर्शन[34] पहावयास मिळते.

जगद्गुरु नित्यलीलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद श्रीश्रीमद्भक्तिसि~~द्धआं~~ध्दांत सरस्वती गोस्वामी 'प्रभूपाद' यांनी ४४२ गौराब्द (सन १९२९ ई.) मध्ये ~~बांग्ला~~बंगाली भाषेत श्रीश्रीमद्भक्तिविनोद ठाकूरकृत 'सन्मोदनभाष्य[35]' तथा 'गीति[36]' तसेच स्वरचित[37] 'विवृत्ति' (लघु-विवरण) सहित श्रीश्रीशिक्षाष्टकास 'साधन-पथ' नामक ग्रंथांतर्गत संपादित आणि प्रकाशित केले ~~आहे~~होते. परंतू हिंदी साहित्यात याचा अभ्याव मला खूपच खटकत होता. परमाराध्य श्रीश्रीगुरुदेवांची हीच अभिलाषा होती की ~~बांग्ला~~बंगाली भाषेतील या अनुपम हितकारीक भक्ति साहित्याचे हिंदी भाषेत प्रकाशन व्हावे याकरिता त्यांनी मला अनुग्रहपूर्वक प्रेरणा प्रदान केली.

Formatted

Formatted

Formatted

Formatted

Formatted

Formatted

Formatted

Formatted

Formatted

30 निगडीत ??
31 उत्तम प्रकारे व्यक्त झाली आहे
32 निजी संपत्ति असलेल्या
33 प्रेम वैचित्त्य ठीक आहे.
34 उदाहरण, नमूना, आदर्श किंवा प्रकार
35 सज्जन भक्तांना आनंद देणारी टीका
36 श्री शिक्षाष्टकातील संस्कृत श्लोकांचा बंगाली भाषेतील पद्य अनुवाद
37 स्वत:च रचलेल्या

अंततः मी गौडीय वेदांत समितिचे ~~भूतपूर्व~~वर्तमान सभापति ~~एवं~~आणि आचार्य, माझे सतीर्थवर[38] परिव्राजकाचार्यवर्य[39] श्रीश्रीमद्भक्तिवेदांत वामन गोस्वामी महाराजांचा विशेष आभारी आहे. हे पराविद्या~~–~~-अनुरागी[40] ~~–~~तसेच प्रभावशाली आचार्य ~~होते~~आहेत[41] ~~,~~; अधिकतू[42] अस्मदीय[43] श्रीगुरुपादपद्म श्री आचार्य केशरींचे[44] परम प्रियपात्र ~~होते~~आहेत. ते ~~नेहमीच~~आता स्वतः श्री~~मो~~गौडीय भक्ति-साहित्याच्या सृजनात आणि संपादनात (~~बांग्ला~~बंगाली भाषा) संलग्न ~~राहिले~~आहेत. ~~तथा~~ त्यांच्या विशेष उत्साह प्रदान करण्यामुळे आणि प्रेरणेमुळेच[45] या समितीचे हे संस्करण (आवृत्ति) प्रकाशित ~~शकले~~होते आहे (हिंदी-संस्करण अथवा आवृत्ति). त्यांनी अनुग्रहपूर्वक[46] परमाराध्य श्रीगुरुदेवांच्या श्रीकरकम~~लांमध्ये~~ळी त्यांच्या या प्रिय ‘शिक्षाष्टकास’ समर्पित करुन त्यांचे मनोऽभिष्ट[47] पूर्ण करावे - हीच त्यांच्या श्रीचरणी कातर प्रार्थना आहे.

या ग्रंथातील संस्कृत अंशाच्या अनुवादात विशेष रुपाने सहयोग दिल्यामुळे त्रिदण्डिस्वामी श्रीभक्तिवेदांत उर्ध्वमन्थी महाराज विशेष धन्यवादास पात्र आहेत आणि स्नेहास्पद श्रीमान शुभानंद ब्रह्मचारी (त्रिदण्डिस्वामी श्रीभक्तिवेदांत तीर्थ महाराज यांचे पूर्वाश्रमीचे नाव) आशीर्वादास पात्र आहेत. याची पाण्डुलिपी प्रस्तुत करण्याकरिता आणि प्रूफ संशोधन आदि विविध कार्यांत त्रिदण्डिस्वामी श्री भक्तिवेदांत पद्मनाभ महाराज, श्रीओमप्रकाश

Formatted

Formatted

---

38 जेष्ठ गुरुभ्राता, गुरुभाऊ अथवा गुरुबंधु (ज्यांनी एकाच गुरुकडून स्वत:च्या आधी दीक्षा घेतली आहे ते)

39 प्रचारासाठी भ्रमण करणारे श्रेष्ठ सन्यासी

40 अध्यात्म्य-विद्येबद्दल प्रेम बाळगणारे

41 भूतकाळ करण्याची काही गरज नाही, वर्तमान काळच ठीक आहे.

42 त्या शिवाय

43 आम्हचे

44 केसरींचे किंवा सिंहाच (सिंहासमान प्राक्रमी आचार्यांचे)

45 त्यांनी प्रदान केलेल्या विशेष उत्साह आणि प्रेरणेमुळेच????

46 कृपया

47 हृदयातील तीव्र आंतरिक ईच्छा

व्रजवासी (~~M~~एम.ए.~~-~~ ~~A~~एल.~~,L~~ एल.~~L.B~~ बी.), स्नेहास्पद श्रीश्यामसुंदर व्रजवासी (बी.एस-सी, बी.एड.),~~स्नेहास्पद~~ श्रीमान् नंदनंदन ब्रह्मचारी, श्रीमान नवीनकृष्ण ब्रह्मचारी (त्रि~~ड~~दण्डिस्वामी श्रीभक्तिवेदांत माधव महाराज यांचे पूर्वाश्रमीचे नाव) तथा श्री सांदिपनी ब्रजवासी आदिंची सेवा-प्रचेष्टा अत्यंत ~~ससह~~प्रशंसनीय आहे.

~~-~~श्रीगुरुपादपद्मांचा या सर्वांवर

* कृपा कर श्रेयनामावली के नाम वर्तमान संदर्भ से जोड़कर यथायोग्य परिवर्तन कर लिखिए (संन्यासदीक्षा आदी अनुसार)

कृपाशिर्वाद असावा. या ग्रंथाच्या प्रकाशनाकरिता परम श्रद्धाळू स्नेहास्पद श्रीयुत सुधांशू शेखर चौधरी यांनी विशेष आर्थिक-आनुकूल्याद्वारे श्रीशचिनंदन गौरहरीची सेवा केली आहे. श्रीश्रीगुरुगौरांगदेव त्यांच्यावर प्रचूर कृपा करोत. ही त्यांच्या श्रीचरणी प्रार्थना आहे.

मला पूर्ण विश्वास आहे की भक्तिपिपासू श्रद्धाळू साधक आणि वि~~द्नान~~द्वान ~~मं~~मंडळींमध्ये या ग्रंथाचा अवश्य समादर[48] होईल. या सगळ्यांनी या ग्रंथाचे पठण करुन श्रीचैतन्य महाप्रभूंद्वारा प्रचारित विमल प्रेमधर्मात प्रवेश ~~करोत~~करावा, हीच अभिष्ट प्रार्थना आहे. परदुःखकातर[49] भगवत्कृपेची साक्षात मूर्ति परमाराध्य श्रीगुरुपादपद्म आणि श्रीशचिनंदन गौरहरि यांनी प्रसन्न होऊन आम्हाला आपल्या मनोभिष्ट सेवेत अधिकार प्रदान करावा- त्यांच्या श्रीचरणकमली हीच एकमात्र सकातर प्रार्थना आहे.

अलमति विस्तरेण[50]।

श्रीगौराविर्भाव[51] तिथि
दोल[52] (होळी) पौर्णिमा

श्रीगुरुवैष्णवकृपालेशप्रार्थी
त्रिदण्डिभिक्षू श्रीभक्तिवेदांत नारायण

---

48 आदर वा प्रशंसा

49 जे दुसऱ्यांचे दुःख पाहून स्वतः दुःख अनुभव करतात ते

50 अति विस्ताराच्या भयाने येथेच माझ्या वक्तव्याला (लेखणीला) विराम देतो.

51 श्री चैतन्य महाप्रभूंची जन्मतिथि

१९०५ भारतीयाब्द [53] श्रीकेशवजी-_गौडीय_मठ

(१७ मार्च १९८४ई.) पो. मथुरा (उ.त्तर प्र.देश)

## मराठी आवृत्तिची प्रस्तावना

**कृपया येथे लिहावे. अनुवादक, प्रुफरीडर, ई. लिहावे.**

## श्रीचैतन्य महाप्रभूंसची वंदना

अनर्पितचरीं चिरात् करुणयाऽवतीर्णः कलौ
समार्पायितुमुन्नतोज्ज्वलरसां स्वभक्तिश्रियम्।
हरिः पुरटसुंदरद्युतिकदम्बसन्दीपितः
सदा हृदयकंदरे स्फुरतु वः श्रीशचिनंदनः।।
(श्रीरुपगोस्वामीकृतविदग्धमाधवनाटके[54])

ज्या सर्वोच्च उज्ज्वल प्रेमरसाचे दान जगतास चिरकालपर्यंत दिले गेले नव्हते, जे आपल्या त्याच निगूढ भक्ति संपत्तिचे दान देण्याकरिता परम करुणापूर्वक कलियुगात अवतीर्ण झाले, सुवर्णकांतिसमुहा (श्रीमती-राधिकेची अंगकांति) द्वारे दैदीप्यमान असे श्रीशचिनंदन[55] सदैव आपल्या हृदयांत स्फूर्ति प्राप्त करोत.

---

52 श्रीश्रीराधाकृष्णांचे श्रीविग्रह पाळण्यावर अथवा झुल्यावर ठेवून त्यांची बंगाल मध्ये जी पुजा होते त्याला दोल पूर्णिमा म्हणतात.

53 भारतीय वर्ष

54 श्री रुप गोस्वामी द्वारा लिखित श्री विदग्ध-माधव नामक नाटकाच्या मंगलाचरणात अथवा नांदीत हा श्लोक येतो.

55 श्री चैतन्य महाप्रभुंच्या आईचे नाव श्री शचिदेवी होते. म्हणून त्यांना श्रीशचिनंदन या नावाने संबोधले जाते.

राधाकृष्ण प्रणयविकृतिर्ल्हादिनीशक्तिरस्मा-
देकात्मानावपि भुवि पुरा देहभेदं गतौ तौ।
चैतन्याख्यं प्रकटमधूना त~~द्द~~द्वयं चैक्यमाप्तं
राधाभावद्युतिसुवलितं नौ~~नि~~मि कृष्णस्वरुपम्।।
(श्री रुप गोस्वामीकृतक~~ऽ~~डचायां[56])

श्रीराधाकृष्णाच्या प्रणय-विकृतिरुप ल्हादिनी शक्तिद्वारे राधाकृष्णस्वरुपात एकात्म होऊनदेखिल विलासतत्वाच्या नित्यतेच्या हेतूने राधा आणि कृष्ण नित्यकाळापर्यंत दोन्हीही स्वरुपात विराजमान आहेत, हीच दोन तत्वे यावेळी एका स्वरुपात चैतन्य तत्त्व रुपात प्रकटित झाली आहेत. अशा राधामाधव आणि कांतिद्वारे आच्छादित त्या ~~मो~~गौररुपधारी कृष्णस्वरुपास मी वंदना करित आहे.

***

## विषय-सूची


प्रथम श्लोक - चेतोदर्पणमार्जनं ...........?-??
सर्वश्रेष्ठ साधन काय आहे?
द्वितीय श्लोक - नाम्नामकारि ........... ??-??
नाम-साधन सुलभ का आहे?
तृतीय श्लोक - तृणादपि .............. ??-??
नाम-साधनाची पद्धत काय आहे?
चतुर्थ श्लोक - न धनं न जनं ........ ??-??
साधकांची अभिलाषा कशी असते?
पञ्चम श्लोक - अयिनन्दतनुज .........??-??
साधकांचे स्वरूप काय आहे?
षष्ठ श्लोक - नयनं ....................??-??
सिद्धिचे बाहेरचे लक्षण काय आहेत?


---

56 कडचा म्हणजे हस्तलिखित टिप्पणी

सप्तम श्लोक - युगायितङ् ..............??-??
सिद्धिका अंतर्लक्षण काय आहेत?
अष्टम श्लोक - आश्लिष्य ............ ??-??
सिद्धिची निष्ठा

***

# श्रीश्रीकृष्णचैतन्यचन्द्रो विजयतेतमाम्[57]

Formatted

## श्रीशिक्षाष्टक

## नामतत्व

## सर्वश्रेष्ठ साधन कोणते?

चेतोदर्पणमार्जनं भवमहादावाग्निनिर्वापणम्
श्रेयःकैरवचन्द्रिकावितरणं विद्यावधुधूजीवनम्।
आनन्दम्बुधिवर्ध्दनं प्रतिपदं पूर्णामृतास्वादनम्
सर्वात्मस्नपनं परं विजयते श्रीकृष्णसंकीर्तनम्।।१।।

**अन्वय-** चेतोदर्पणमार्जनं (चित्तरुपी दर्पणाचे[58] शोधन/मार्जन करणारे), भवमहादावाग्नि-निर्वापणं (संसारुपी महादावावानल[59] संपूर्णपणे विझवून टाकणारे), श्रेयःकैरवचन्द्रिका-वितरणं (जीवांच्या कल्याणरुपी कुमुदिनीच्या विकासाकरिता भाव-चंद्रिके[60]चे -जीवनस्वरूपवितरण करणारे), विद्यावधूजीवनं (विद्यारूप वधूसाठी जीवनस्वरूप), आनंदाम्बुधिवर्धनं (आनंदरुपी समुद्रास निरंतर वर्ध्दित करणारे), प्रतिपदं पूर्णामृतास्वादनं (पदोपदी पूर्ण अमृताचे रसास्वादन करविणारे), आणि सर्वात्मस्नपनं (देह, धृति[61], आत्मा आणि

Formatted

57 श्रीश्रीकृष्णचैतन्यरूपी चंद्राचा विजय असो.
58 आरश्याचे
59 वनाला लागलेली आग
60 चंद्रिका म्हणजे चंद्र-प्रकाश
61 धैर्य

स्वभावास सर्वतोभावेन स्नानाद्वारे अंतर्बाह्य[62] निर्मळ आणि सुशीतल करणारे) परं (केवळ अर्थात् एकमात्र अथवा सर्वोपरि[63]) श्रीकृष्णसंकीर्तनं विजयते (श्रीकृष्ण संकीर्तनच विशेष जययुक्त होवो)

**अनुवाद-** चित्तरुपी दर्पणाचे शोधन करणारे, मार्जन करणारे संसाररुपी महादावानलास–[64] संपूर्णपणे विझवणारे, जीवांच्या कल्याणरुपी कुमुदिनीस विकसित करण्याकरिता भावरुपी चंद्रिकेचे वितरण करणारे, विद्यारुपी वधूचे जीवनस्वरुप, आनंदरुपी समुद्रास निरंतर वर्धित करणारे, पदोपदी पूर्ण अमृताचे रसास्वादन करविणारे, देह-धृति-आत्मा आणि स्वभाव या सर्वांना अंतर्बाहय-सर्वतोभावेन निर्मळ आणि सुशोभित करणारे केवळ श्रीकृष्ण-संकीर्तन हेच विशेष रुपाने सर्वोपरि जययुक्त होवो।।१।।

**सन्मोदनभाष्यम्**

[श्रीलसच्चिदानंदभक्तिविनोदठाकूक्कुरविरचितम्[65]]

पंचतत्वांन्वितं नित्यं प्रणिपत्य महाप्रभूम्।
नाम्ना सन्मोदनं शिक्षाष्टकभाष्यं प्रणीयते।।
"भगवान् ब्रह्म कात्सर्न्येन त्रिरन्वीक्ष्य मनीषया......
.......विजयते विशिष्टतया सर्वोत्कर्षेण वर्त्तते ।।१।।"

(page 2 to page 7)

## सन्मोदनभाष्याचा अनुवाद

नमः ॐ विष्णुपादाय गौरप्रेष्ठाय भूतले।
श्रीमद्भक्तिप्रज्ञानकेशव इति नामिने।।
नमो भक्तिविनोदाय सच्चिदानन्दनामिने।

62 बाहेरून आणी आतून सुद्धा
63 सर्वात वरती अर्थात सर्वश्रेष्ठ
64 जंगलात लागलेल्या भयानक आगीस
65 श्रील सच्चिदानंद भक्तिविनोद ठाकूर यांच्या द्वारे विरचित

Formatted
Formatted
Formatted

गौरशक्तिस्वरुपाय रुपानुगवराय ते ।।

नमो महावदान्याय कृष्णप्रेमप्रदाय ते।
कृष्णाय कृष्णचैतन्यनाम्ने गौरत्विषे नमः।।

अत्यंत दीनहीन आणि सर्वतोभावेन अयोग्य असूनसुद्धा मदीय परमाराध्य नित्यलिलाप्रविष्ट ॐ विष्णुपाद अष्टोत्तरशत_श्रीश्रीलभक्तिप्रज्ञान केशव गोस्वामी, सन्मोदन–-भाष्यकर्ता श्रीम्मोगौररसुंदर यांचे नित्यपरिकर श्रीलभक्तिविनोद ठाकूर आणि “श्रीशिक्षाष्टक” चे मूळ रचयिता कलियुग-पावनावतारी श्रीनंदनंदन अभिन्नविग्रह श्रीकृष्णचैतन्य महाप्रभूंच्या सर्वाभिष्टप्रद श्रीचरणकमलांना हृदयांत धारण करुन त्यांच्याच कृपेने त्यांच्याच मनोऽभिष्ट पूर्तीकरिता “श्रीसन्मोदनभाष्य” या ग्रंथाचा भाषानुवाद करण्यास प्रवृत्त होत आहे. - **(अनुवादकाचे मंगलाचरण)**

Formatted

सदासर्वदा पंचतत्वांनी युक्त, श्रीनामप्रेमप्रदाता स्वयं भगवान् चैतन्य महाप्रभूंच्या श्रीचरणारविन्दात प्रणतिपूर्वक त्यांच्याच श्रीमुखविलगित “श्रीशिक्षाष्टका” चे “सन्मोदन” नामक भाष्य लिहीत आहे. संसारचक्रात सापडलेल्या भागवद्विमुख जीवांचे कल्याण कसे होईल? याकरिता भगवत्-तत्वाचे ज्ञाता असणारे श्रीब्रह्माजी अत्यंत चिंतीत झाले. त्यांनी एकाग्र चित्त होऊन समस्त वेदांचे तीन वेळा अनुशीलन केले आणि आपल्या बुद्धीने हा निश्चय केला की ज्यायोगे सर्वात्मा भगवान श्रीकृष्णाप्रति अनन्य प्रेमप्राप्ती होते, तोच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. श्रीमद्भागवताच्या या सिद्धांतामुळे हेच सिद्ध होते की जीवांकरिता एकमात्र भगवद्भक्ति हीच परमार्थप्रद धर्म आहे. कर्म, ज्ञान, योग आणि तपस्या इत्यादि अन्य साधन-समूह परमार्थप्रद परमधर्म नाहीत. परंतू ही भक्ति सुदुर्लभा आहे. केवळमात्र पारमार्थिकी श्रद्धेद्वारेच ही सुलभ आहे. पारमार्थिकी श्रद्धा दोन प्रकारची असते- (१) शास्त्रांच्या शासनयुक्त वचनांनी प्रेरित होऊन भक्तिमार्गात प्रवृत्त करविणारी “**शास्त्रार्थावधारणामयी**”श्रद्धा श्रद्धा (२) भगवल्लीलामाधुर्याचे श्रवण आदींमुळे

Formatted

कुठल्यातरी विशेष सौभाग्यवश उत्पन्न लोभामुळे भक्तिमध्ये प्र~~वृ~~वृत्त करविणारी “**भगवल्लीलामाधुर्यलोभमयी श्रद्धा**”. या दोहोंपैकी कोणतीही एक श्रद्धा उत्पन्न झाल्यावर निर्मळ सत्संगात राहून नियमितरुपाने हरिकथेचे सेवन केले तरच शुद्धाभक्ति उदित होते. ~~यो~~ ~~-दोहोंपैकी कोणतीही एक श्रद्धा उत्पन्न झाल्यावर निर्मळ~~जर सत्संगात ~~सहून~~ नियमितरुपाने हरिकथेचे सेवन केले नाही तर उक्त श्रद्धा क्रमशः क्षीण होऊन नष्ट होते.

श्रीमद्भागवतात भगवान् स्वयं म्हणतात- ~~-~~सत्संगात माझ्या महिमेच्या प्रकाशक - हृदय आणि कानांना प्रिय वाटणाऱ्या ज्या कथा असतात, त्यांचे प्रीतीपूर्वक सेवन केल्याने शीघ्रच अविद्या दूर होऊ लागते आणि माझ्या प्रति क्रमशः श्रद्धा, रति, आणि प्रेमाभक्ति उदित होते. अतः सत्संगात भगवंताचे नाम, रुप, गुण आणि लीलांचे श्रद्धापूर्वक ~~,~~सेवन केल्यानेच शुद्ध संकीर्त्तन संभव आहे, अन्यथा नाही.

श्रीचैतन्य महाप्रभूंच्या शिक्षेत (शिकवणीत) सर्वप्रथम त्या शुद्ध संकीर्तनाचीच महिमा वर्णिली आहे. श्रीकृष्णकीर्त्तन सर्वमंगलस्वरुप असल्यामुळे मूळ श्लोकाच्या चौथ्या चरणांत जो ~~“प~~“परं” शब्द उल्लिखित आहे, त्याद्वारे सर्वप्रथम श्रद्धा तत्पश्चात सत्संग आणि त्यानंतर भजनक्रियेअंतर्गत शुद्ध श्रीकृष्णसंकीर्तनासच लक्ष्य बनविले गेले आहे. ~~येथे~~या भजनक्रियेचा प्रतिबिंब भक्त्याभासाच्या अंतर्गत केल्या जाणाऱ्या हरिकीर्तनाशी ताप्तर्य[66] नाही. या शिक्षाष्टकात करुणावरुणालय श्रीचैतन्य महाप्रभू~~जी~~ जीवांना संबंध, अभिधेय आणि प्रयोजन तत्वांना बोध करविण्याकरिता[67] स्वयं एका भक्तिसाधकाप्रमाणे श्रीकृष्णस्वरुप श्रीकृष्णसंकीर्तनाच्या महिमेचे गान करीत आहेत. या भाष्याअंतर्गत त्याचा संबंध, अभिधेय आणि प्रयोजन तत्त्वांविषयी संक्षिप्तरूपे (संक्षेपात) विचार व्यक्त केला जात आहे.

शुद्ध वैष्णवांद्वारे ज्यांच्या चरणकमलांची सर्वतो~~-~~भावेन निरंतर सेवा केली जाते ते सर्वे~~श~~श्वरेश्वर श्रीचैतन्य महाप्रभूजी म्हणतात- “परं विजयते

66 संबध

67 समजावून सांगण्याकरिता

Formatted

Formatted

श्रीकृष्णसंकीर्तनम्” अर्थात् केवळ श्रीकृष्णकीर्तन हेच सर्वतोभावेन सर्वोपरि जययुक्त होवो. येथे प्रश्न उद्भवू शकतो की मायाशक्तीद्वारे रचित या जड जगतामध्ये मायातीत-अप्राकृत श्रीकृष्णसंकीर्तन कसे काय सर्वोपरि जययुक्त होऊ शकते? होय, या मायिक जड जगतात देखील श्रीकृष्णसंकीर्तन सर्वोपरि जययुक्त होऊ शकते. ते कशा प्रकारे जययुक्त होऊ शकते, याचे श्रवण करावे. “एकमेवाद्वितीयम्”- या श्रृतिमंत्रामात्रांमुळे परमतत्वाचे एकत्व; “नेह नानाऽस्ति किंचन” (केवळ अद्वय ब्रह्मअतिरिक्त- त्यांच्यापासून संपूर्ण पृथक् (भिन्न) असलेले नानारुप (वेगवेगळे रूप) काहीही (बिलकूल) नाहीत.) - या श्रुतीमंत्रांद्वारे त्यांचे निर्विशेषत्त्व आणि “सर्वं खल्विदं ब्रह्म” (हे संपूर्ण जगत् ब्रह्मस्वरुप आहे)- या श्रुतीमंत्राद्वारे त्यांचे नित्य सविशेषत्व प्रतिपादित होते.- अतः (म्हणून) श्रुतींअनुसार परमतत्त्व एकाचवेळी सविशेष आणि निर्विशेष दोन्हीही आहे. परंतू असे असूनसुद्धा निर्विशेषतत्वाची कुठलीही उपलब्धी न झाल्याने- त्याचा अभाव राहिल्याने आणि केवळ सविशेषतत्वत्वाचीच सदासर्वदा उपलब्धी झाल्याने सविशेषतत्वच प्रधान आणि श्रेष्ठ आहे. आपले तत्वाचार्य आपल्या स्वाभाविकी अचिंत्यशक्तिच्या प्रभावाने स्वरुप, तद्रूपवैभव, जजीव आणि प्रधान (प्रकृति)- या चार रुपांमध्ये सदा सर्वदा विद्यमान असतात, ठीक तसेच जसे सूर्याच्या अंतर्गत मंडळस्थित तेज, मण्डळ, मंडळाबहिर्गत रश्मिपरमाणू –[68]आणि त्याची प्रतिबिंबरश्मी- या चार रुपात एकच सूर्य अवस्थित आहे. उपरोक्त तत्वास आणखी सुस्पष्ट केले जात आहे- षडैश्वर्यशाली भगवान् श्रीकृष्ण हेच परम तत्व आहेत. ते सर्व-– शक्तिमान आहेत. “शक्ति-शक्तिमतोरभेदः”- या ब्रह्मसूत्रानुसार शक्ती आणि शक्तिमान अभिन्न आहेत अर्थात् या दोन्हींमध्ये कुठलाही भेद नाही. परंतू एकच पराशक्ती विविध रुपांत श्रुतीगोचर[69] होत असते. या वेदमंत्रांद्वारे हेच सिद्ध होते की ती अचिंत्यशक्ती अघटघटनपटीयसी देखील आहे अर्थात (अशक्यालाक्य सुद्धा शक्य करविणारी) देखील आहे. म्हणूनच शक्ति आणि

68 प्रकाश कण

69 कानाद्वारे ऐकु येते अथवा ऐकण्यात आहे.

Formatted

शक्तिमान यांच्यात नित्यभेद जेखील अनिवार्य आहे. या सिद्धांताविषयी केवलाद्वैतवादी यांचे हे मत आहे की, “ब्रह्म निर्विशेष, निःशक्तिक, निराकार आहे”- जे अशास्त्रीय आणि युक्तिविरुद्ध आहे. उपर्युक्त एक पराशक्ती हीच अंतरंगा, तटस्था आणि बहिरंगा- अशा तीन स्वरुपांत प्रकाशित आहे. अंतरंगा स्वरुपशक्तिद्वारे ते परमतत्व आपल्या पूर्णस्वरुपात- सर्वदोषविवर्जित- परम मंगलमय- निखिल अप्राकृत गुणांचे आधार असलेल्या भगवंतांच्या रुपात नित्य विराजमान अस~~तात~~ते. त्याचबरोबर आपल्या लीला संपादित (संपन्न) करण्याकरीता आपल्या त्याच आनुकूल्यमयी स्वरुपशक्तीद्वारे तद्रूपवैभव अर्थात वैकुंठ आदी धाम, परिकर आणि नारायण आदी भगवत् स्वरुपांमध्ये नित्य अवस्थित आहे. पुन्हा तेच परमतत्व केवळमात्र तटस्थाशक्तियुक्त आपल्या विभिन्नांशस्वरुप असंख्य चित् परमाणू ~~आणि~~ अर्थात ~~-~~जीवांच्या रुपात विद्यमान आहेत. ज्याप्रमाणे सूर्यकिरणात असंख्य क्षुद्र-क्षुद्र परमाणू झिलमिल करत (चमकत) असतात, त्याचप्रमाणे भगवंतांच्या तटस्था शक्तिरुपी किरणांमध्ये (तटस्था-शक्ति-परिणत) असंख्य- असंख्य अणुचित् जीवसमूह नित्य विद्यमान आहेत. जसे सूर्यकिरणांतर्गत सुक्ष्म परमाणुंचे सूर्यापासून वेगळे- किंवा भिन्न असे कुठलेच अस्तित्व असू शकत नाही~~.~~ ~~तरीदेखील~~आणी ते परमाणू सूर्य कदापि~~होऊ~~ असू शकत नाहीत;~~,~~ तसेच अणुचित् जीवांचे देखील भगवंतापासून पृथक् असे को~~ले~~णतेच अस्तित्व नाही ~~तरीसुद्धा~~आणि ते कदापि भगवंत म्ह~~म~~णवले जाऊ शकत नाहीत आणि बनू शकत नाहीत. पुन्हा परमतत्व भगवान् तदीया बहिरंगा मायाशक्तिद्वारे तदीय बहिरंग वैभवरुप या संपूर्ण जड-जगतास प्रकटित करतात. हे जड~~-~~- जगत् मायाशक्ति अर्थात् प्रधा~~नस्वरुपाना~~ी~~च~~चीच परिणती आहे. जसे सूर्यकिरण प्रतिबिंबित होऊन रंगीबेरंगी इंद्रधनुष्य निर्माण करतात, ठीक तशाच प्रकारे मायाशक्ती ~~मायाशक्ती~~ अथवा प्रधान या विचित्र जड~~-~~-जगताची निर्मिती करते. जडजगत्~~-~~ हे अंतरंगा शक्तिद्वारे प्रकटित चिद्जगताची छाया आहे. म्हणूनच जड जगतदेखील परमतत्वापासून वेगळे नाही.

Formatted

Formatted

अशाप्रकारे जीव, जड-जगत् आणि वैकुंठगत तद्रूप वैभवा~~चे~~ यांचे भगवत्-स्वरुपा~~ने~~शी– असलेला भेद आणि अभेद - अचिंत्य भेदाभेद दोन्हीही सिद्ध आहेत. अणुचित् जीव भगवंताचे आश्रित असल्याने त्यांचे विभिन्नांश आहेत. तसेच ते भगवत्-ज्ञानाच्या अभावामुळे बहिर्मुख बनतात- हाच त्यांच्यातील भेद आहे.

जसे (ढगांच्या) सावलीमुळे सूर्यकिरण आच्छादित होतात, त्याप्रमाणे जीव-समूह देखील माया (अविद्या) द्वारे आच्छादित होऊन जातात. अघटन-घटन-पटीयसी भगवंतांच्या तटस्था शक्तिद्वारे प्रकटित अणुचित् जीव भगवंतांच्या लीलांचे उपकरण असल्याकारणाने जड-मायेद्वारा आच्छादित ~~असतात~~ होतात~~.~~; अन्यथा चिन्मय जीव जयमायेद्वारा कसे काय आवृत्त होऊ शकतात? तटस्था शक्तिद्वारे प्रकटित झाल्यामुळे जीवाचा स्वभावसुद्धा तटस्थ होतो, अर्थात्– जीव सेवासुख प्राप्त करु शकतात आणि दुसरीकडे मायिक-भोग-वासनांमुळे मायेद्वारे आच्छादित सुद्धा होऊ शकतात. परंतू स्वरुप शक्तिशी संबंधयुक्त झाल्यानंतर अविद्यानामक मायाशक्ति दूर होते~~.~~. फलस्वरुप संसार-दशेतून मुक्त होऊन जीव आपल्या शुद्ध स्वरुपात अवस्थित होतो.

मायामुग्ध जीव सांसारिक क्लेशांमुळे पुन्हा-~~-~~पुन्हा जर्जरित होऊन जातो. जेव्हा तो या क्लेशांना कंटाळून सौभाग्यवश सत्संगाचे सेवन करतो, तेव्हा त्याला शास्त्रांचे एकमेव तात्पर्य – (असलेल्या??) भगवद्- भक्तिप्रति विश्वास अथवा भगवंतांच्या –माधुर्याप्रती लोभ उत्पन्न होतो. त्यावेळी त्यास स्वरुप-–शक्तिची ह्लादिनी-सारवृत्ती-स्वरुप भक्तिमध्ये अधिकार प्राप्त होतो श्रद्धा उत्पन्न झाल्यानंतर सर्वप्रथम श्रीगुरु-चरणाश्रय (हरिनाम-दीक्षाग्रहण) प्राप्त होतो, नंतर श्रीगुरुदेव आणि शुद्ध वैष्णवांच्या सत्संगात तत्व श्रवणाचा सुयोग प्राप्त होतो, तत्पश्चात जेव्हा श्रीकृष्णाच्या नाम, रुप, गु~~म~~ण, लीला आदिंचे किर्तन होऊ लागते, तेव्हा माया-दमनाची प्रक्रिया सुरु होते. अर्थात् अविद्या आणि अनर्थ दूर होऊ लागतो (लागतात???), त्याचबरोबर जीवाचे शुद्ध-स्वरुपदेखील निर्मळ होऊ लागते. प्रापंचिक जगतात हरिकिर्तनाच्या

Formatted

विजयाची हीच प्रक्रिया आहे. याच पद्धतीने हरिकिर्तनाचे या मायिक जगतात अवतरण होते. या प्रणालीद्वारे केलेल्या हरिकिर्तनाद्वारेच जीवांस सात प्रकारची सुफले (उत्तम-फळे??) प्राप्त होतात. त्या सात प्रकारच्या फलांचे (फळांचे??) वर्णन पहिल्या श्लोकात 'चेतोदर्पणमार्जनं' इत्यादींद्वारे प्रतिपादित केले गेले आहे. त्याचे (त्या फळांचे?) पृथक्-पृथक (वेगवेगळ्या??) रुपांत विवेचन प्रस्तुत करीत आहे.

'चेतोदर्पणमार्जनं' इत्यादीद्वारे जीवाच्या स्वरुपतत्वाचा बोध करविला गेला आहे. याविषयी श्रीजीवगोस्वामींचा सिद्धांत हा आहे की, "जीव नामक समष्टिशक्तियुक्त परमतत्वाचा एक क्षुद्र अंश म्हणजेच जीव होय. सूर्याच्या अंतर्गत तेजःपुंजामुळे निर्माण झालेले बहिर्गत रश्मितील (सूर्यकिर~~ण्यांसमान~~णातील) परमाणूसमान जीवसमूह अखंड-चिन्मय-रसविग्रह, सर्वदा स्वरुपस्थित परमतत्वापासून बहिर्गत चित्परमाणू आहेत." वेदांतसूत्राचे श्रीगोविंदभाष्यकार श्रीबलदेव विद्याभूषण यांनीदेखील असा विचार प्रकट केला आहे- ईश्वर विभुचैतन्य आहे आणि जीव अणुचैतन्य आहे. ईश्वरात अखिल कल्याणकारी अनंत सद्गुण नित्य विराजमान असतात, त्यांच्यात 'मीपणाचा' निर्मळ अहंकार असतो, ते ज्ञानस्वरुप आणि ज्ञातास्वरुप दोन्ही आहेत; त्याचप्रमाणे जीवांमध्येसुद्धा आंशिक गुणसमूह आणि शुद्ध अहंकार असतो तथा हेसुद्धा ज्ञानस्वरुप आणि ज्ञातास्वरुप आहेत. असे असणे युक्तिविरुद्ध नाही, कारण सूर्यात प्रकाश आणि तापदान आदी जे गुण पाहिले जातात, सूर्य किरणात (परमाणूंत) तेच गुणसमूह दिसून येतात. त्यात ईश्वर स्वतंत्र आहे, एक आहे, स्वरुप-शक्तिमान आहे. प्रकृति आदिंत अनुप्रवेशपूर्वक यांचे नियमन करीतच या विश्वाची रचना करतात, तिला धारण करतात, चिन्मय सुखाची घनमूर्ती आहे, सदासर्वदा स्वस्वरुपांत अवस्थित रहाणारे तथा भक्तिद्वारे प्रेमरसास प्रदान करणारे- त्याचे रसास्वादन करविणारे आहेत. परंतू जीव असंख्य आहेत, ते बद्ध आणि मुक्त अशा अनेक अवस्थांमधील आहेत, परमेश्वरापासून विमुख होताच बद्ध होतात, पुन्हा परमेश्वराप्रती

उन्मुख झाल्यानंतर जीवांच्या शुद्ध स्वरुपास आणि गुणांस आवृत्त करणाऱ्या मायेचे आवरण निघून जाते. त्यानंतर अशा जीवांना स्वस्वरुपाचा साक्षात्कार होतो. या सिद्धांतामुळे हे स्पष्ट होते की जीव अणुचित् आहेत. त्यांचे एक चिन्मय स्वरुप आहे आणि ते शुद्ध अहंकार (मी-पणा), शुद्ध चित्त आणि शुद्ध शरीराने युक्त आहेत.

भगवत्-विमुख झाल्यानंतर बहिरंग मायिक विषयांप्रती भावाविष्ट झाल्यानंतर त्यांचा शुद्ध अहंकार आणि शुद्ध चित्त अविद्यारुपी मलाने मलीन होऊन जाते. येथे चित्ताची तुलना दर्पणाशी केली गेली आहे. जसे धुळीने आच्छादित मलीन दर्पणात आपण आपले मुख बघू शकत नाही, तसेच अविद्यारुपी मलाद्वारे मलीन झालेल्या चित्तात स्वस्वरुपाचे यथार्थ दर्शन होऊ शकत नाही. ह्लादिनी सारवृत्तीस्वरुप भक्तिचे साधन जेव्हा सुरु होते, तेव्हा श्रवणानंतर श्रीकृष्णसंकीर्तन स्वयं प्रादुर्भूत होऊन अविद्यारुपी मलास संपूर्णपणे धुऊन टाकते. त्या वेळी जीवाचे शुद्ध अहंकारयुक्त विशुद्ध चित्त उदित होते, ज्यामुळे तो आपल्या शुद्ध चित्तरुपी दर्पणात  ईश्वर, जीव , प्रकृती, काळ आणि कर्म या पाच तत्वांचे यथार्थ रुपात दर्शन करु शकतो. चित्त-दर्पण निर्मळ झाल्यामुळे यथार्थतः स्वस्वरुपदर्शन आणि त्यामुळे स्वधर्माचे दर्शन संभव होते. भगवत्-दास्य अर्थात् भगवत्-सेवा हाच जीवाचा स्वधर्म आहे. भगवत् सेवेत तत्पर झाल्यामुळे संसार-प्रवृत्ती कृष्ण-सेवा प्रवृत्तीमध्ये परिणत होऊन जाते. “जीवाचे” या संसारात पुन्हा पुन्हा जन्म घेणे हेच “भव” शब्दाचे तात्पर्य आहे. पुन्हा पुन्हा जन्म आणि मरणच महादावाग्निस्वरुप आहे. हा महादावाग्नि श्रीकृष्ण-संकीर्तना अतिरिक्त आणखी कुठल्याही उपायाने विझू शकत नाही. येथे प्रश्न उद्भवू शकतो- स्वधर्मज्ञानाची उपलब्धी झाल्यानंतर श्रीकृष्णसंकीर्तन बंद होऊन जाते का? नाही, असे कदापिही घडत नाही. हरि-संकीर्तन जीवाचा नित्यधर्म आहे. येथ त्या स्वरुपगत नित्यधर्माच्या नित्यतेचा बोध करविण्याकरिताच ‘श्रेयःकैरवचन्द्रिकावितरणकारी’ या विशेषण-पदाचा प्रयोग केला गेला आहे. मायाग्रस्त जीवांकरिता मायाभोगच प्रेयः (प्रार्थनीय) असतात, यामुळेच त्यांना

अनिवार्य संसाररुपी जन्म आणि मृत्यूच्या चक्राचे तथा त्रितापाचे भोग भोगावे लागतात. याच्या ठीक विपरित मायेप्रती विरक्त राहून/होऊन श्रीकृष्ण सेवेतच सदा-सर्वदा तत्पर रहाणेच श्रेयस्कर आहे अर्थात् श्रेयः आहे. हे 'श्रेयः' म्हणजेच कुमुदिनी आहे. ज्याप्रमाणे चंद्र आपल्या स्निग्ध चंद्रिकेद्वारे (ज्योत्स्ना) कुमुदिनीस प्रस्फुटित करीत असतो, त्याचप्रमाणे श्रीकृष्ण-संकीर्तन आपल्या भाव-रुपिणी चंद्रिकेचे वितरण करुन जीवांच्या कल्याणरुपी कुमुदिनीस विकसित करते. 'भक्तिद्वारे भक्ती उत्पन्न होते'- या सिद्धांतवचनानुसार सुरुवातीला श्रवण-कीर्तन आदी आभास भक्तिचे पुन्हा पुन्हा साधन केल्यामुळे श्रद्धाळू जीवांच्या हृदयात शुद्धा-भक्तिचा प्रादुर्भाव होतो. येथे श्रीकृष्ण संकीर्तनाची उपमा चंद्राला दिली गेली आहे. जसे चंद्राच्या अमृतस्वरुप ज्योत्स्नेमुळे कुमुदिनी पुष्प  विकसित होते, तसेच श्रीकृष्ण-संकीर्तनामुळे ह्लादिनीसार-वृत्ति भाव वा रती जीवांच्या हृदयात उदित होतो तथा त्यामुळे सर्व प्रकारच्या कल्याणांचा विकास होतो.

येथे असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो की ज्यांना शुद्धाभक्ति प्राप्त झाली आहे, त्यांना आपल्या शुद्ध स्वरुपाची प्राप्ती केव्हा होते? श्रीशचीनंदन गौरचंद्र या प्रश्नाचे उत्तर देतांना सांगतात- "विद्यावधूजीवनम्". वास्तवात भगवंतांची एकच शक्ति आहे. तिच्या दोन वृत्ती आहेत- विद्या आणि अविद्या. योगमाया- स्वरुपशक्ति हीच विद्या आहे आणि जडजगत-सृष्टीकारिणी, जीवाचे स्वरुप आणि स्वरुप-संबंधी गुणांवर आवरण टाकणारी महामाया हीच अविद्या आहे. श्रवण-कीर्तन करता करता ज्यावेळी साधकाच्या हृदयात शुद्ध भक्तिचा उदय होतो, त्यावेळी भगवत् सेवे अतिरिक्त अन्यान्य कामना-वासनांना दूर करणारी भक्तिदेवी उक्त अविद्येस दूर सारून विद्यावृत्तीद्वारे जीवाच्या स्थूल आणि लिंगमय अशा दोन्ही देहांना (आवरण) विनष्ट करुन टाकते. त्याचबरोबर जीवाच्या स्वरुपगत शुद्ध चित्तमय शरीरास एवढेच नव्हे तर अधिकार भेदाने मधूररस आस्वादन योग्य शुद्ध चिन्मय गोपीदेहासही प्रकटीत करते. म्हणूनच श्रीकृष्ण-कीर्तन विद्यारुपिणी वधूचे जीवनस्वरुप आहे

हे सिद्ध झाले. श्रीकृष्णाच्या लीलाविलास-वर्णन प्रसंगात स्वरुपशक्तिचे श्रीकृष्ण-वधुत्व द्रष्टव्य आहे.

स्थूल-लिंगमय मायिक देह संपूर्ण रुपाने विनष्ट झाल्यानंतर जीवाचे अणुत्व निर्मळ होऊन जाते. त्यावेळी जीवाचे स्वरुप अणू (क्षुद्र) असल्यामुळे त्याचे स्वरुपगत सुखसुद्धा क्षुद्रच असायला हवे. या आशंकेस दूर करण्याच्या उद्देशाने श्रीचैतन्य महाप्रभू शिक्षा (शिकवण) देतात-
“आनंदाबुद्धिवर्धनम्” अर्थात त्या अवस्थेत श्रीकृष्ण-संकीर्तन ह्लादिनीसारवृत्तिद्वारे जीवाच्या स्वाभाविक आनंदास अनंत अपरिसीमारुपात संवर्धित करतात- अर्थात् शुद्ध स्वरुप प्राप्त जीव या दशेत अपरिसीम आनंदाचा लाभ घेतात. या दशेमध्ये जीव चिन्मय एकरस होऊन अर्थात् दास्य, सख्य, वात्सल्य आणि मधूर यापैकी कुठल्याही एका रसात नित्यस्थित होऊन नवनवायमान अनुरागाद्वारे पदोपदी पूर्णामृताचे रसास्वादन करित असतात. भगवंताची रुप-माधुरी, गुणमाधुरी आणि लीलामाधुरी आदि नित्यनवीन असते. प्रेमी जीव या माधुरींचे निरंतर पान करीत असतात तरीसुद्धा सदैव अतृप्तच असतात. म्हणून ते नित्यनवीन रूपांत त्या माधुरींचे निरंतर पान करतात. येथे अशी आशंका निर्माण होते की स्वसुखभोगाची चेष्टा अथवा लालसा तर विशुद्ध प्रेमाच्या विरोधी आहे, मग त्या अवस्थेत जीव जेव्हा नित्यनवीन प्रेमानंदास भोगत असतो, तेव्हा स्वसुखभोग असल्यामुळे त्यास निर्मळ प्रेमानंद कसे का म्हटले जाऊ शकते? जणू काही या आशंकेस दूर करण्याकरिताच संन्यासी चुडामणी श्रीचैतन्य महाप्रभूंनी “सर्वात्मस्नपनकारी” या विशेषणपदाचा उपयोग केला आहे. त्या अवस्थेमध्ये कृष्णानंद संपूर्ण निर्मळ असल्याने स्वसुखभोग आदी कामनारहित जीव स्वाभाविकरुपात ह्लादिनी सार महाभावमयी श्रीमती राधिकेच्या परिचारिकेच्या रुपात युगुलविलास संबंधी संपूर्ण आनंदाचा भोग-रसास्वादन करतात. म्हणूनच त्यांच्यात प्रेम-विरोधी कामाचा गंधदेखील रहण्याची संभावना नसते. येथे ‘सर्वात्म स्नपनम्’ या दोन पदांच्या प्रयोगाद्वारे सायुज्य

मुक्ति अंतर्गत ब्रह्मांत विलीन होण्याचा दोष तथा स्वसुख भोगाचा दोष यापासून सर्वथा रहित परम निर्मळतेचा बोध होतो. अशा प्रकारे सप्तगुण विशिष्ट सच्चिदानंद-स्वरुप श्रीराधाकृष्णयुगल प्रेमविचित्रलीलापर श्रीकृष्णसंकीर्तन विशेषरुपाने सर्वोपरि जययुक्त होवो।।१।।

**श्रीचैतन्यचरितामृत**

नामसंकीर्तने हय सर्वार्थनाश।
सर्वशुभोदय कृष्णप्रेमेर उल्लास।।
संकीर्तन हैते पाप-संसार नाशन।
चित्तशुद्धि, सर्वभक्तिसाधन-उद्गम।।
कृष्णप्रेमोद्गम प्रेमामृत-आस्वादन।
कृष्णप्राप्ति, सेवामृतसमुद्रे मज्जन।।
(श्री चै.च.अ. २०/११,१३,१४)

श्रीकृष्णसंकीर्तनाने समस्त प्रकारच्या अनर्थांचा नाश होतो, चित्त निर्मळ बनते, जन्मजन्मांतरीचे पाप आणि त्यायोगे प्राप्त पुन्हा पुन्हा जन्म-मृत्यूरुप संसार नष्ट होतो, सर्वप्रकारचे कल्याण उदयास येते, प्रेमाभक्तिच्या सर्व साधनांचा संचार होऊ लागतो, कृष्णप्रेमाचा उदय होतो, प्रेमामृताचे रसास्वादन होऊ लागते, श्रीकृष्णाची प्राप्ती होते आणि अंततः सेवामृतरुपी समुद्रात संपूर्णपणे अवगाहनाद्वारे सुशीलता आणि निर्मळता प्राप्त होते.

श्रीलभक्तिविनोद ठाकुरजीद्वारा लिखित

**किर्त्तनपद**

पीतवरण कलिपावन गोरा।
गावई ऐछन भाव-विभोरा।।

चित्तदर्पण-परिमार्जनकारी।
कृष्णकिर्त्तन जय चित्तविहारी।।

हेलाभवदाव- निर्वापणवृत्ति।
कृष्णकीर्त्तन जय क्लेशनिवृत्ति।।

श्रेय: कुमुदविधुज्योत्स्ना-प्रकाश।
कृष्ण कीर्त्तन जय भक्तिविलास।।

विशुद्ध विद्या-वधु-जीवन रुप।
कृष्ण कीर्त्तन जय सिद्ध स्वरुप।।

आनंदपयोनिधी वर्धनकिर्ति।
कृष्णकिर्त्तन जय प्लावनमूर्त्ति।।

पदे-पदे पीयूषस्वाद प्रदाता।
कृष्णकीर्त्तन जय प्रेम विधाता।।

भक्तिविनोद- स्वात्मस्नपन विधान।
कृष्णकीर्त्तन जय प्रेम निदान।।

\- गीतावली

* * *

## नामसाधन सुलभ का आहे?

**नाम्नामकारि बहुधा निजसर्वशक्ति-**

**स्तत्रार्पिता नियमितः स्मरणे न कालः।**
**एतादृषी तव कृपा भगवन्ममापि**
**दुर्दैवमीदृशमिहाजानि नानुरागः।।२।।**

अन्वय- (हे) भगवन्! नाम्नां बहुधा अकारि (आपण अहैतुकी कृपापरवश होऊन जीवांच्या कल्याणाकरिता 'कृष्ण' 'गोविंद' आदि अनेक नामांच्या रुपाने प्रकाशित आहात) तत्र (त्या सर्व नामांमध्ये) निजसर्वशक्तिः आर्पिता (आपल्या त्या त्या स्वरुपांच्या सर्वशक्ति निहीत केलेल्या आहेत) स्मरणे काल अपि न नियमितः (अथच नामस्मरणात संध्या वंदना आदिंप्रमाणे निर्दिष्टकाल आदिंचा विचार नाही ठेवला गेलाय अर्थात दिवसा-रात्री-कुठल्याही समयी भगवन्नाम स्मरण-कीर्तन केले जाऊ शकते- असे विधान दिले आहे) तव एतादृशी कृपा (अशी तर आपली कृपा आहे) मम ईदृशं दुर्दैवं (परंतू माझे नामापराधरुपी दुर्दैव असे आहे की) इह (अशा सुलभ सर्वफलप्रद हरिनामात) अनुरागः न अजनि (अनुराग उत्पन्न होत नाही) ।।२।।

**अनुवाद-** हे भगवन्। आपले नामच जीवांकरिता सर्वमंगलप्रद आहे, अतः जीवांच्या कल्याणाकरिता आपण आपल्या राम, नारायण, कृष्ण, मुकुंद, माधव, गोविंद, दामोदर, आदि अनेक नामांच्या रुपाने नित्य प्रकाशित आहात. आपण त्या नामांमध्ये त्या-त्या स्वरुपांच्या सर्वशक्तिंना स्थापित केलेले आहे. अहैतुकी कृपाहेतू आपण त्या नामांच्या स्मरणात संध्या-वंदना आदिंप्रमाणे कुठल्याही निर्दिष्टकाळ आदिंचा विचार देखील ठेवला नाही, अर्थात दिवस-रात्र, अगदी कुठल्याही समयी भगवन्नामाचे स्मरण-किर्तन केले जाऊ शकते- असे विधान देखील बनवले आहे. हे प्रभो! आपली तर जीवांवर इतकी अहैतुकी कृपा आहे, तथापि माझे तर नामापराधरुपी असे दुर्दैव आहे की आपल्या अशा सर्वफलप्रद सुलभ नामांमध्येसुद्धा अनुराग उत्पन्न होत नाही ।।२।।

सन्मोदभाष्यम्- तत्र नाम-रुप-गुण.........
तदा, तेषां सर्वार्थसिद्धिरित्युपदिष्टम् ।।2।।

(pg- 24to pg-28)

# सन्मोदन भाष्याचा अनुवाद

नाम, रुप, गुण आणि लीलांच्या भेदाने उक्त श्रीकृष्ण संकीर्त्तनाचे चार प्रकार आहेत. श्रीकृष्णनाम सर्व प्रकारच्या आनंदाचे मूळ बीज-स्वरुप आहे, श्रीनाम आणि श्रीनामी एक, अभिन्न तत्व आहेत. श्रीकृष्णनाम संकीर्त्तनच सर्वांकरीता सर्व प्रकारे सर्वाधिक उपादेय आहे. म्हणूनच स्वयं-भगवान् श्रीचैतन्य महाप्रभू कृष्णनाम संकीर्त्तनाची परम उपादेयता प्रदर्शित करतांना भगवन्नामांत जीवांची श्रद्धा उत्पन्न व्हावी याकरिता म्हणत आहेत- हे भगवन्। हे परम करुणामय। आपण मला सर्व प्रकारे निराश्रय पाहून अहैतुकी कृपापरवश होऊन स्वतःहून अभिन्न अशा आपल्या नामांना मुख्य आणि गौण भेदाने अनेक प्रकारे प्रकाशित केले आहे. त्यात हरि, कृष्ण, गोविंद, अच्युत, राम, अनंत आणि विष्णु आदि मुख्य नावे आहेत. ब्रह्म, परमात्मा, नियंता, पाता, स्त्रष्टा, महेंद्र आणि गौण नावे आहेत. पुन्हा आपण आपल्या स्वरुप- शक्तिच्या सगळ्या शक्ति आणि संपूर्ण सामर्थ्याला आपल्या मुख्य नामांत भरुन ठेवले आहे

विविध शास्त्रांची वचने याच प्रमाणे आहेत -

(क) भगवन्। आपल्या केवळ दर्शनानेच मनुष्याची सारी पापे क्षीण होऊन जातात, ही काही असंभव गोष्ट नाही; कारण आपले नाव एकदाच श्रवण केल्याने मात्र नीच चांडाळ सुद्धा संसारचक्रातून मुक्त होतात.

(ख, ग, घ) द्विजांद्वारे (ब्राह्मणांद्वारे) जितक्या परिमाणात वेदाक्षरांचे पठण होते, तितक्याच परिमाणात त्यांचे (गौण रुपांत) हरिनामाचे कीर्तन

आपोआप होते. यात कुठलाही संशय नाही. परंतू ज्यांनी ‘हरि’ या दोन अक्षरांचे उच्चारण केले आहे तेव्हा त्यांच्याद्वारे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद- या सगळ्यांचे पठण आपोआप झाले असे समजले पाहिजे. म्हणूनच ऋक्, यजुः, साम आणि अथर्व आदि काहिसुद्धा पठण करु नका, केवळमात्र ‘गोविंद’ या नित्य गेय हरिनामाचेच सदा-सर्वदा किर्तन करा.

(ङ) जे लोक भगवत्कीर्त्तनाची अवज्ञा करतात ते लोक त्या पाप-कर्माने घोर नरकात पतित होऊन जातात.

(च) हे राजन्! जे लोक संसारात दुःख भोगून त्यापासून विरक्त, ऐकांतिक भक्त आहेत, जे स्वर्ग आणि मोक्षाची कामना बाळगतात, तसेच ते आत्मराम योगी पुरुष आहेत, त्या सर्वांकरिता समस्त शास्त्रांचे व पूर्वाचार्यांचे हेच मत आहे कि त्यांनी भगवन्नामाचे प्रेमाने संकीर्तन करावे.

(छ) हे विष्णो! आपले नाम चित्स्वरुप आहे. म्हणूनच ते स्वप्रकाशरुप आहे. अतः नामोच्चरणाच्या महिमेचे यथायोग्य ज्ञान नसले तरी जर थोडी सुद्धा महिमा जाणून आपण श्रीभगवन्नामाचे उच्चारण आणि संकीर्त्तन केले तर आपण तद्विषयक (त्या विषयी) संपूर्ण ज्ञान प्राप्त करु शकतो. ‘ॐ’ या नामाचा उपदेश ब्रह्माजींनी केला होता. याचे उच्चारणानेच संसाराचे भय नष्ट होते. म्हणूनच ‘ॐ’ या नामास ‘तारक ब्रह्म’ म्हटले जाते.

(ज) जो निरपराध होऊन ‘हरि’ या दोन अक्षरांचा केवळ एकदाच उच्चार करतो, तो भगवच्चरणारविंदांची सेवा आणि मोक्ष प्राप्तिकरीता कृतसंकल्प होऊन जातो.

(झ) सूतजी! ते हृदय नाही, लोह आहे, जे भगवंताच्या मंगलमय नामाचे श्रवण-कीर्त्तन करुनसुद्धा विरघळून त्यांच्याकडेच प्रवाहित होत नाही. ज्यावेळी हृदय विरघळते, त्यावेळी नेत्रांतून अश्रूधारा प्रवाहित होऊ लागतात, आणि शरीराचे रोम-रोम पुलकित होतात.

(ञ) हे भृगुवर! हे श्रीकृष्णनाम मधुराहूनही सुमधूर आहे. सर्व प्रकारच्या मंगलांहूनही परममंगलस्वरुप आहे तथा संपूर्ण वेदरुपी कल्पलतेचे विशुद्ध चिन्मय नित्य सत्फल-स्वरुप आहे. जर कुणी मनुष्य श्रद्धा अथवा अवहेलनापूर्वक कसेही असो, परंतू निरपराध होऊन याचे एकदातरी किर्तन करतो, तर हे श्रीकृष्णनाम त्याचवेळी कीर्तनकारी मनुष्यमात्राचा संसारातून उद्धार करते (अथवा करून टाकते).

(ट) अर्जुना! मी तुला हे सत्य सांगतो आहे की जे लोक माझ्या नामाचे किर्तन करीत माझ्या समीप विचरण करतात, ते निश्चित रुपाने मला विकत घेतात. मी संपूर्णपणे त्यांच्या अधीन होऊन जातो.

(ठ) श्रीकृष्णनाम चिंतामणि समानच सर्वार्थप्रदाता आहे, ते स्वयं-कृष्ण, चैतन्य-रसविग्रह, पूर्ण, मायातीत, नित्यमुक्त आहे, कारण श्रीकृष्णनाम आणि श्रीकृष्ण-स्वरुप नामी दोन्हीही अभिन्न तत्व आहे.

(ड) म्हणूनच श्रीकृष्णाचे नाम, रुप, गुण आणि त्यांची लीला प्राकृत चक्षु-कर्ण आदि इंद्रियांद्वारे ग्राहय नाहीत. सेवोन्मुख जिव्हा आदिमध्ये ते स्वयं स्फुरीत होते.

अशाप्रकारे श्रृति, स्मृति आणि तंत्रांच्या वचनांनी हरिनामात सर्वशक्तिंची विद्यमानता प्रतिपादित होते. कर्म, ज्ञान, योग आदिंच्या साधनात देश, काल आणि पात्र आदिंचा विचार अथवा नियम प्रबळ असतात. परंतू आपण आपल्या नामांचे स्मरण आणि कित्र्तन आदिंमध्ये देश, काळ, आणि पात्र आदिंचा कुठलाही नियम नाही ठेवलाय- हे आमच्या प्रति आपल्या अपार कृपेचे उदाहरण आहे. इतके असूनसुद्धा हे आमचे अत्यंत दुर्भाग्य आहे कि आपल्या अशा परम उदार नामांच्या प्रति थोडासुद्धा अनुराग नाही होऊ शकत. येथे ‘दुर्भाग्य’ म्हणजे नामापराध असे तात्पर्य आहे. खाली नामापराधाविषयी संक्षेपात काही सांगितले जात आहे.

भगवत्-विमुख जीव मायारचित जड-जगतात नाना प्रकारच्या विषयांच्या आसक्तिंनी बांधले गेले आहेत. ते कधी सुद्धा भगवंताप्रति उन्मुख

होण्याची चेष्टा करीत नाहीत. ते सर्व समयी दुःखजनक कर्म आणि ज्ञान आदि साधनांमध्येच तत्पर रहातात. परंतू या साधनांनी जीवाचे नित्यकल्याण कदापि साधित होऊ शकत नाही- असा विचार करुन अपार करुणामय श्रीकृष्णाने आपल्या स्वरुप-शक्तिच्या ल्हादिनी-सारस्वरुप भक्तिचा जीवांच्या हृदयांत संचार करविण्याकरीता, त्यांना भक्ति-प्राप्तिचा उपाय-स्वरुप आपल्या नामांना प्रकटित करुन ठेवले आहे. परंतू त्या नामांना श्रवण करुन अथवा त्यांचा जप करुनसुद्धा नामापराधामुळे जीवांना नामाप्रति अनुराग होत नाही. म्हणून श्रद्धाळू पुरुषांनी श्रीगुरुदेवांच्या मुखातून हरिनाम प्राप्त करुन नामापराध- रहित होऊन श्रद्धापूर्वक यथासाध्य जप आणि नाम-संकीर्त्तन करावयास हवे.

नामापराध दहा प्रकारचे आहेत - (१) संतांच्या निंदेमुळे श्रीनामानिकट घोर अपराध होतो; ज्या नामपरायण संत-महात्म्यांद्वारे श्रीकृष्णनामाच्या महिमेचा संसारात प्रचार होत असतो, त्यांची निंदा श्रीनामप्रभू कशी काय सहन करु शकतील? अतः साधुसंतांची निंदा हा पहिला अपराध आहे. (२) या संसारात जे लोक बुद्धिद्वारे परम मंगलमय श्रीविष्णुंच्या नाम, रुप, गुण आणि लीला आदिंमध्ये भेद दर्शन करतात अर्थात् भौतिक पदार्थांप्रमाणेच विष्णुचे नाम, रुप, गुण, आणि लीलांना नामी-विष्णुपेक्षा वेगळे मानतात अथवा शिव आदि देवतांना विष्णुपेक्षा स्वतंत्र ईश्वर किंवा विष्णुसमान मानतात, त्यांचे ते हरिनाम (नामापराध) निश्चितच अहितकर आहे. (३) नाम-तत्वविद् गुरुंना मरणशील आणि पंचभौतिक शरीरयुक्त साधारण मनुष्य मानून त्यांची अवज्ञा करणे. (४) वेद आणि सात्वत पुराण आदि शास्त्रांची निंदा करणे. (५) हरिनामाच्या महिमेस अतिस्तुति समजणे. (६) भगवन्नमास काल्पनिक समजणे अपराध आहे. (७) श्रीनामाच्या बळावर पाप-कर्म करण्याची ज्यांची प्रवृत्ति आहे, त्यांची यम, नियम, ध्यान, धारणा आदि विविध कृत्रिम योग- प्रक्रियांद्वारेसुद्धा शुद्धी होऊ शकत नाही- हे निश्चित आहे (८) धर्म, व्रत, त्याग, होम आदि

प्राकृत सत्कर्मांना अप्राकृत भगवन्नामासमान अथवा समतुल्य समजणे सुद्धा प्रमाद किंवा असावधानता आहे (९) श्रद्धाहीन आणि नाम-श्रवण आदिंपासून विमुख मनुष्यास श्रीनामाचा उपदेश करणेदेखील नामापराध आहे. (१०) जे श्रीनामाची अद्भुत महिमा ऐकून देखील जड शरीरात "मी" आणि सांसारिक पदार्थांत "माझे" ही बुद्धि ठेवतो तथा नामोच्चारणात प्रीति किंवा आग्रह नाही दाखवत, तो सुद्धा नामापराधी आहे.

या दहा प्रकारच्या नामापराधांरहित होऊन नामसंकीर्त्तन करणे आवश्यक आहे. नामसंकीर्त्तन करणाऱ्याने सत्कर्मीप्रमाणे सत्कर्माद्वारे पाप दूर करण्याची आणि पुण्य-संचय करण्याची चेष्टा (प्रयत्न) करु नये, कारण त्यांच्या कर्माधिकार समाप्त झालेला असतो. परंतू जर त्यांच्याकडून नामापराध घडत असेल तर त्यांनी मोठ्या व्याकूळ हृदयाने निरंतर कृष्णनाम ग्रहण करायला हवे. असे निरंतर हरिनाम ग्रहण केल्याने नंतर अपराध करण्याची कुठलीच शक्यता रहात नाही तथा पूर्वकृत अपराधसमूहसुद्धा नष्ट होऊन जातात. जसे शास्त्रांमध्ये सांगितले गेले आहे की- 'नामापराधयुक्त व्यक्तिंच्या पापांचा नाश केवळ श्रीनामच करण्यास समर्थ आहे.' म्हणूनच निरंतर श्रीकृष्णनाम संकीर्त्तन करावयास हवे. त्यामुळे नामापराध दूर होतो आणि परमार्थस्वरुप श्रीकृष्ण प्रेमाची प्राप्ति होते.

अशा प्रकारे अपराध-शून्य (अपराध-रहित) झाल्यावर श्रीहरिनामाप्रति अनुराग उत्पन्न होतो आणि त्यावेळस सर्वार्थाची सिद्धि होते. येथे सर्वार्थाचे तात्पर्य "श्रीकृष्ण-प्रेम" असे आहे. श्रीचैतन्य महाप्रभूंची हीच द्वितीय शिकवण आहे।।२।।

श्रीचैतन्यचरितामृत

अनेक लोकेर वांछा अनेक प्रकार।<br>
कृपाते कहिल अनेक नामेर प्रचार।।

खाइते शुइते यथा तथा नाम लय।
काल-देश-नियम नाहि सर्वसिद्धि हय।।

सर्वशक्ति-नामे दिल करिया विभाग।
आमार दुर्दैव नामे नाहि अनुराग।।
- (चै. च. अ. २०/१७-१९)

मायाबद्ध भगवत्-विमुख लोकांच्या हृदयांत नाना प्रकारच्या कामना असतात. म्हणून ते आपल्या स्वरुपधर्म भगवद्-भक्तिपासून वंचित असतात. भगवंत दयाळू आहेत, त्यांनी दयेस वशीभूत होऊन आपल्या अनेक नामांना प्रकटित केले आहे, आणि त्या नामांच्या उच्चारणात देश, काल आणि पात्र आदिंचा कुठलाही विशेष नियमसुद्धा ठेवण्यात आलेला नाही. खाता-पिता आणि झोपतांनासुद्धा श्रीकृष्णनाम केल्याने/घेतल्याने सर्वार्थाची सिद्धी होते. अहो, श्रीकृष्णाने आपल्या त्या नामांमध्ये आपली संपूर्ण शक्ति भरली आहे परंतू माझे दुर्भाग्य आहे की अशा श्रीकृष्ण नामांत माझा थोडादेखील अनुराग नाही.

कीर्त्तनपद

तुहुँ दयासागर तारयिते प्राणी।
नाम अनेक तुया शिखायलि आनि।।

सकल शकति देइ नामे तो हारा।
ग्रहणे राखलि नाहि काल विचारा।।

श्रीनाम चिंतामणि तोहारि समाना।
विश्व बिलाओलि करुणा-निदाना।।

तुया दया ऐछन परम उदारा।

अतिशय मंद नाथ भाग हमारा।।

नाहि जनमल नामे अनुराग मोर।
भक्तिविनोद- चित्त दुःखे विभोर।।

\- गीतावली

* * *

# नाम साधनाची पद्धत कोणती?

**तृणादपि सुनीचेन तरोरपि सहिष्णुना।**
**अमानिना मानदेन कीर्त्तनीयः सदा हरिः।।३।।**

**अन्वय-** तृणादपि सुनीचेन (सर्वपद-दलित, तुच्छ तृणाहूनही स्वतःस दीन-हीन, प्राकृत मर्यादारहित समजून) तरोरपि सहिष्णुना (वृक्षाहूनही अधिक सहनशील बनून) अमानिना (स्वयं अमानी अर्थात् मानरहित बनून) मानदेन (दुसऱ्यांना यथायोग्य मान देणारा बनून) सदा हरिः कीर्त्तनीयः (सदा-सर्वदा निरंतर श्रीहरिनाम-संकीर्त्तन करीत रहावे) ।।३।।

**अनुवाद-** सर्वपद-दलित अत्यंत तुच्छ तृणाहूनही स्वतःस दीन-हीन नीच समजून, वृक्षाहूनही अधिक सहनशील बनून, स्वयं अमानी होऊन अर्थात् मानरहित होऊन, दुसऱ्यांना यथायोग्य मान देणारा बनून सदा सर्वदा-निरंतर श्रीहरिनाम-संकीर्त्तन करीत रहावे ।।३।।

**सन्मोदनभाष्यम्-** निरपराधेन हरिनामकृतं............
श्रीमन्महाप्रभू-पादेनोपदिष्टम्।।३।।

(pg-36 to pg-38)

**सन्मोदनभाष्याचा अनुवाद**

निरपराध होऊन श्रीकृष्ण-नामाचे संकीर्त्तन करणाऱ्या साधकांमध्ये चार प्रकारची लक्षणे दिसून येतात- विषयांप्रति विरक्तिजनित स्वाभाविक दीनता, मत्सरताररहित निर्मल दया, जडीय मिथ्या अभिमानरहित हृदयाची निर्मळता आणि सर्वांप्रति यथायोग्य सन्मानाची भावना. साधकाच्या हृदयात अप्राकृत

चिन्मय रसाचे मूर्तिमान् विग्रहस्वरुप श्रीहरिनामाचा अविर्भाव झाल्यानंतर साधकाच्या हृदयात अशा प्रकारचे भावोद्‌गार प्रकट होतात- अहो, मी स्वरुपतः अणुचैतन्य श्रीकृष्ण-दास आहे. जडीय विषयांप्रति माझे काहीच प्रयोजन नाही. हाय! हाय!! श्रीकृष्णापासून विमुख झाल्यामुळेच माझी सध्या ही दुर्दशा झाली आहे- जन्म मरणांच्या चक्रात सापडून नाना प्रकारच्या तापांनी दग्ध झालो आहे. आता मी श्रीगुरु-वैष्णवांच्या कृपेने हे जाणले आहे की भगवद्भक्तिच्या साधनेद्वारेच माझी विमुखता दूर होऊ शकते तथा पुन्हा स्वरुपात स्थिर होऊन भगवत्-प्रेम प्राप्त करु शकतो. अतः भगवत्कृपेद्वारे जोपर्यंत संसारातून सुटका होत नाही, तोपर्यंत मला युक्त वैराग्याचे अवलंबन करुन संबंधज्ञानासोबत जीवन-निर्वाहोपयोगी विषयांना ग्रहण करावयास हवे. अभाव, रोग, शोक, म्हातारपण आदिंमुळे उत्पन्न दुःख आणि अर्थादि प्राप्ति, स्वास्थ्य, बल, विद्या आदिंमुळे प्राप्त सुख- ही प्रारब्धाची फळे आहेत; मला ती फळे अवश्य भोगावे लागतील. हानी-लाभ, जीवन-मरण, सुख-दुःख - हे पारमार्थिक नाहीत. तेव्हा या जडविषयांशी माझा काहीच संबंध नाही- असा विचार करुन मी अत्यंत दीनतापूर्वक "हा कृष्ण! हा गौरचंद्र! हा प्राणनाथ! मला आपली शुद्ध सेवा कधी प्राप्त होईल? आपण माझ्यासारख्या दीनहीनावर कृपा करावी, मला शीघ्र अंगीकारावे"- असे म्हणत म्हणत घरात अथवा वनात येन केन प्रकारेण (कसे-बसे) जीवन व्यतीत करीन. तृण यद्यपि जड वस्तू आहे, तथापि त्याचा वस्तुगत अभिमान (अहंकार) स्वाभाविक आणि न्याय-संगत आहे. परंतू माझा वर्तमान स्थूल-सूक्ष्म शरीरगत अभिमान (अहंकार) शुद्धस्वरुपसंबंधी नसल्यामुळे वस्तुतः योग्य नाही. तृणाचा अभिमान वास्तविक आहे, परंतू माझा जडाभिमान अवास्तिक आहे. तेव्हा माझ्याकरीता तृणाहूनही सुनीच होणे यथार्थच आहे.

आता 'तरोरपि सहिष्णुना'- या वाक्याचा अर्थ असा आहे की वृक्ष इतके सहनशील असतात की आपल्याला कापणाऱ्यालाही आपली सुशीतल सावली आणि सुमधूर फळे देऊन उपकार करण्यास विसरत नाही. कृष्णभक्त तर त्याहूनही दयाळू असल्याने शत्रू वा मित्र सगळ्यांवरच उपकार करतात. ही

‘निर्मत्सरतायुक्त दया’ हरिनामकीर्त्तनकारी साधू पुरुषांचे दुसरे लक्षण आहे. निरपराध होऊन हरिनाम कीर्त्तन करणाऱ्यांचे भावोद्गार असे असतात- ‘हे नाथ! माझे संगी-साथी हे जीवसमूह अत्यंत अभागी आहेत. याची आपल्या मंगलमय श्रीनामात रति कशी होणार? हे तर मायांध होऊन स्त्री-पुत्र, धन-संपत्ति, जय-पराजय, हानि-लाभ आणि जन्म-मृत्युच्या सुख-दुःखात लिप्त आहेत. यांना अनर्थयुक्त जड-विषयांप्रति थोडीसुद्धा विरक्ति होत नाही. हे नाना प्रकारच्या भोग-वासनांच्या दृढ रज्जूंनी आबद्ध होत आहेत. सर्वसमयी आपात्-रमणीय, परंतू परिणाम दुःखदायी कर्मफल- लौकिक आणि स्वर्ग सुखभोग तसेच ज्ञानफल-मुक्तिच्या शोधात अत्यंत व्यस्त असतात. या लोकांची आत्मस्वरुप-दर्शनात कशी काय रुचि उत्पन्न होणार?” असे म्हणत-म्हणत ते साधक जीव भाव-विभोर होऊन उच्च स्वरात पदगान करतात-

हरेर्नाम हरेर्नाम हरेर्नामैव केवलम्।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा।।

अर्थात् कलियुगात केवळ हरिचे नामच,  हरिचे नामच, हरिचे नामच एकमात्र गति आहे. याच्या अतिरिक्त अन्य कुठलीही गति नाही आणि निश्चित रुपाने गति नाही.

‘अमानी’- शब्दाद्वारे कीर्त्तनकारी साधकांच्या मिथ्याभिमान-शून्यतारुप तिसऱ्या लक्षणास सूचित केले गेले आहे. मायाबद्ध जीवांचे स्थूल आणि सूक्ष्म शरीर-संबंधी योगेश्वर्य, भोगैश्वर्य, धन-वैभव, रुप, जाति, वर्ण, बल, प्रतिष्ठा आणि अधिकाराने उत्पन्न होणारे जितके अहंकार आहेत, ते सगळे स्वरुप-विरोधी आणि मिथ्या आहेत. या मिथ्या अहंकारांपासून रहित होणे म्हणजेच 'मिथ्याभिमानशून्यता' होय. अशा प्रकारे त्या अहंकारांच्या अस्तित्वाचा हेतू जरी विद्यमान असला तरी मिथ्याभिमानशून्यता आणि सहनशीलतारुपी गुणांनी अलंकृत व्यक्तिच श्रीहरिनाम कीर्त्तन करण्यास योग्यतम अधिकारी आहेत. असे शुद्ध साधक भक्त गृहस्थाश्रमात ब्राह्मण असण्याचा अभिमान तथा त्यागी असल्यावर (झाल्यावर??) संन्यासी आणि वैरागी असल्याचा

अभिमान- या सर्वांचा सर्वथा परित्याग करून श्रीकृष्णाच्या चरणकमळीच अनन्य रुपाने चित्तास लावून श्रीकृष्णाचे नामसंकीर्त्तन करतात.

तदनंतर 'मानद' शब्द सगळ्यांना यथायोग्य मान देणेच संकीर्त्तनकारी भक्ति-साधकांचे चौथे लक्षण असल्याचे सूचित करतो. ते जीवमात्रांना कृष्णदास समजून कुणाशीही द्वेष वा प्रतिहिंसेची भावना ठेवत नाही. ते आपल्या मधूर वचनांनी आणि जगन्मंगलकारी आचरणाने सर्वांनाच संतुष्ट ठेवतात. या जगतात अधिकारी ब्राह्मण आदि योग्यता-संपन्न मनुष्यांना, ब्रह्मा, रुद्र आदि देवतांना नम्रतापूर्वक यथायोग्य सन्मान देतात; त्यांच्याकडे भगवद्भक्तिची प्रार्थना करतात. विशेषतः शुद्धभक्तांची सर्वतोभावेन प्रीतीपूर्वक सेवा करतात.
अशा प्रकारे उक्त चार लक्षणांनी युक्त होऊन केले गेलेले श्रीकृष्णनामसंकीर्त्तनच परम पुरुषार्थाचे साधन आहे. कलियुग पावनावतारी श्रीचैतन्य महाप्रभुंची हीच शिकवण आहे।।३।।

## श्रीचैतन्यचरितामृत

उत्तम हञा आपनाके माने तृणाधम।
दुइ प्रकारे सहिष्णुका करे वृक्षसम।।

वृक्ष जेन काटिलेह किछु ना बोलय।
शुकाइया मैलेह कारे पानी ना मागय।।

जेई जे मागये, तारे देय आपन धन।
घर्म-वृष्टि सहे, आनेर करये रक्षण।।

उत्तम हइञा वैष्णव हबे निरभिमान।
जीवे सम्मान दिबे जानि कृष्ण-अधिष्ठान।।

एइ मत हइआ जेई कृष्णनाम लय।
श्रीकृष्णचरणे ताँर प्रेम उपजय।।

(चै. च. अ. २०/२२-२६)

उत्तम असूनसुद्धा जो स्वतःस तुच्छ तृणाहूनही अधिक हीन-दीन क्षुद्र समजतो, जो वृक्षासमान दोन प्रकारे सहनशील असतो- जसे वृक्ष कापल्यानंतरही काहीच बोलत नाही, सुकून जाऊन मरतांना देखील कुणाकडे पाणी मागत नाही, मागणाऱ्यांना फळे, फुले, लाकूड, साल, रस आपले सर्वस्व देतो. स्वतः ऊन आणि पाऊस झेलत दुसऱ्यांची ऊन आणि पावसापासून रक्षा करतो, तसेच हा सहनशील भक्त स्वतः कसलीच अपेक्षा करीत नाही आणि दुसऱ्यांना सर्वस्व देऊनही त्यांची रक्षा करतो, एवढेच नाही तर तो जीवाचा स्वरुपगत धर्म- कृष्णप्रेमासही प्रदान करतो; जो उत्तम असूनही निरभिमानी रहातो आणि जीवमात्रांत कृष्णाचे अधिष्ठान जाणून त्यांना यथायोग्य सन्मान देतो, तोच श्रीकृष्णनाम कीर्त्तनाचा यथार्थ अधिकारी आहे आणि अशाप्रकारे श्रीकृष्णनामाचे कीर्त्तन करणाऱ्यासच श्रीकृष्णप्रेमाची प्राप्ती होते.

## कित्र्तनपद

श्रीकृष्ण कीर्त्तने यदि मानस तोहार।
परम यतने तँहि लभ अधिकार।।

तृणाधिक हीन दीन अकिंचन छार।
आपने मानबि सदा छाडि अहंकार।।

वृक्ष सम क्षमा गुण करबि साधन।
प्रतिहिंसा त्यजि अन्ये करबि पालन।।

जीवन-निर्वाहे आने उद्वेग ना दिबे।

पर-उपकारे निजसुख पासरिबे।।

हइलेओ सर्वगुणे गुणी महाशय।
प्रतिष्ठाशा छाडि कर अमानी हृदय।।

कृष्ण-अधिष्ठान सर्वजीवे जानि सदा।
करबि सम्मान सबे आदरे सर्वदा।।

दैन्य, दया, अन्ये मान, प्रतिष्ठा-वर्जन।
चारि गुणे गुणी हइ करइ कीर्त्तन।।

भक्तिविनोद काँदि बले प्रभु पाय।
हेन अधिकार कबे दिबे हे आमाय।।

-गीतावली

जर तुम्हाला श्रीकृष्णनाम कीर्त्तन करायची ईच्छा असेल, तर परम यत्नांनी त्यात अधिकार प्राप्त करावा. आपल्या जडीय अहंकारास त्यागून स्वतःस तृणाहूनही दीन, हीन आणि क्षुद्र समजा. वृक्षासमान सहनशील बना. वृक्षासमान क्षमाशीलतेचा गुण आपलासा करा (वृक्षासमान क्षमा गुण आपलासा करा???), प्रतिहिंसा सोडून सगळ्यांचे पालन-पोषण करा. आपल्या जीवन निर्वाहाकरिता कुणासही उद्वेग देऊ नये. आपल्या सुखांचा परित्याग करुनही परोपकार करा, सर्वगुणांचे आगार होऊनसुद्धा प्रतिष्ठा मिळवण्याची लालसा दूर ठेवा आणि जीवमात्रांत श्रीकृष्णाचे अस्तित्व जाणून त्यांना आदरपूर्वक यथायोग्य सन्मान द्या. अशाप्रकारे दीनता, दया, मान आणि प्रतिष्ठा-वर्जन या चार गुणांनी विभूषित होऊन श्रीकृष्ण-संकीर्तन करा श्रीभक्तिविनोद

ठाकूर क्रंदन करित-करित प्रभूंच्या चरणकमळी ही प्रार्थना करीत आहेत- प्रभो! मला असा अधिकार कधी प्रदान कराल?

* * *

## साधकांची अभिलाषा कशी असावी?

**न धनं न जनं न सुंदरीं**
**कवितां वा जगदीश कामये।**
**मम जन्मन जन्मनीश्वरे**
**भवताद्भक्तिरहैतुकी त्वयि।।४।।**

**अन्वय-** हे जगदीश! अहं धनं न, जनं न, सुंदरीं कवितां वा न कामये (मी धन, जन वा सुंदरी कविता यापैकी कसलीच अपेक्षा करीत नाही), मम (माझी), जन्मनि जन्मनि (केवळ हीच प्रार्थना कि जन्मजन्मांतरी), ईश्वरे त्वयि अहैतुकी भक्तिः भवतात् (आपल्या श्रीचरणकमळी माझी अहैतुकी भक्ति राहो)।।४।।

**अनुवाद-** हे जगदीश! मी न धन मागतो, न जनांची अपेक्षा करतो, सुंदरी कवितेचीही मला अपेक्षा नाही. ईच्छा केवळ इतकीच हे प्राणेश्वर, आपल्या श्रीचरणकमळांप्रति माझी जन्म-जन्मांतरी अहैतुकी भक्ति राहो।।४।।

सन्मोदनभाष्यम्- आदौश्रद्धधानानां............
किमुपायविरोधिन्या तत्प्रार्थनया?।।४।।

(pg.45 to pg.46)

# सन्मोदनभाष्याचा अनुवाद

श्रद्धाळू साधकांनी सर्वप्रथम श्रीगुरुदेव मुखनिःसृत श्रीहरिनामाचे श्रवण करावयास हवे. तदनंतर निरपराध होऊन श्रद्धापूर्वक श्रीहरिनामाचे कीर्तन करावे. या प्रणालीने युक्त होऊन (प्रणालीद्वारे???) भगवन्नामाचे कीर्तन केल्याने साधकाच्या हृदयात पूर्वोक्त चार प्रकारच्या लक्षणांचा प्रादुर्भाव होतो. परंतू अन्वय व्यक्तिरेकरुपामध्ये (व्यक्तिरेकरुपाने??? ) जडजगतात वैषयिक सुखांशी संबंधरहित झाल्याशिवाय साधकाच्या शुद्ध स्वरुपाचा उदय होत नाही आणि शुद्ध स्वरुपाचा उदय झाल्याशिवाय हलादिनीची सार-वृत्तिस्वरुपा भक्ति-भावभक्तिच्या रुपात परिणत होत नाही. असा विचार करुन श्रीनामसंकीर्त्तनरुप साधनभक्तिच्या शुद्धस्वरुपास व्यक्तिरेक लक्षणाद्वारे दोन श्लोकांमध्ये स्पष्ट केले जात आहे. ‘न धनं न जनं’ इत्यादी. येथे अन्वयाचे तात्पर्य आनुकूल्यमय कृष्णानुशीलन रुप मुख्य लक्षणाशी आहे तथा व्यक्तिरेकाचे तात्पर्य भक्तिच्या अतिरिक्त अन्याभिलाषिताशून्य आणि कर्मज्ञानादिद्वारे अनावृत्त होणे - या दोन गौण लक्षणांशी आहे. जोपर्यंत आनुकूल्यमय कृष्णानुशीलन-अन्याभिलाषिताशून्य आणि कर्म, ज्ञान, योग आदिंद्वारे अनावृत्त नाही होत तोपर्यंत ते कृष्णानुशीलन शुद्धा अथवा उत्तमा भक्ति नसते. अपितु (परंतु?) ते भक्तिचा आभास मात्र आहे. येथे उक्त आभासाला दूर करण्याकरिता शिकवण दिली जात आहे- “हे जगदीश! मी धन, जन अथवा सुंदरी कविता आदी काहीदेखील मागत नाही.” येथे ‘धन’ शब्दाचे वर्णाश्रमनिष्ठ धर्मधन, लौकिक आणि पारलौकिक जडीय सुख भोगाच्या समस्त प्रकारच्या कामना तथा स्थूल-लिंग(सुक्ष्म)-इंद्रियांसाठी सुखकर अर्थ अर्थात् धनसंपत्ति आणि भोग विलासाच्या साधनांशी तात्पर्य आहे. ‘जन’- पद स्त्री, पुत्र, दास, दासी, प्रजा आणि बंधू-बांधव यांना लक्ष्य (इंगित) करते. जिच्यामुळे भगवंताच्या चरणकमळी मति होते तिला ‘विद्या’ म्हणतात. ‘सुंदरी-कविता’- या पदाद्वारे मात्र

भगवंताच्या लीलाकथा, तत्व आणि कीर्त्तन संबंधित अप्राकृत काव्या अतिरिक्त दुसऱ्या काव्यासंबंधी असणाऱ्या साधारण विद्येविषयी सांगितले गेले आहे. मी या समस्त वस्तुंकरिता तुमच्याकडे प्रार्थना नाही करीत, परंतू जन्मजन्मांतरी आपल्याप्रति अर्थात् प्राणेश्वर कृष्णाप्रतिच माझी अहैतुकी भक्ति राहो- केवळ हीच प्रार्थना आहे. इतर कामना-वासनारहित, चिन्मयस्वभावयुक्त, श्रीकृष्णाला आनंद देणारी, शुद्धा, केवला, अकिंचना आणि अमिश्रा भक्तिस अहैतुकी भक्ति म्हणतात. जन्म-मरणरुप जड-यंत्रणेस (जड-दुःखास??) दूर करणे जीवांच्या प्रयत्नापलिकडची गोष्ट आहे - ते केवळ भगवदिच्छेच्या अधीन आहे. अन्यान्य दुःखाची निवृत्ति तर आपोआपच होईल - अतः भक्तिविरोधी अशा प्रार्थनेची आवश्यकताच काय? म्हणूनच भगवदच्छिने जोपर्यंत जन्म-मृत्यूचा प्रवाह बंद होत नाही, तोपर्यंत जन्मजन्मांतरी जेथे कोठेही, कुठल्याही स्वरुपात असेन, भगवत्पदारविंदाप्रति माझी अहैतुकी भक्ति अढळ राहो- बस हीच माझी एकमात्र प्रार्थना आहे ।।४।।

## श्रीचैतन्यचरितामृत

शुद्धभक्ति कृष्ण ठाँइ मागिते लागिला।।

प्रेमेर स्वभाव याँहा प्रेमेर संबंध।
सेइ माने कृष्णे मोर नाहि भक्तिगंध।।

धन जन नाहि माँगो कविता सुंदरी।
शुद्ध भक्ति देह मोरे कृष्ण कृपा करि।।

अति दैन्य पुनः माँगो दास्य भक्तिदान।
आपनाके करे संसारी जीव अभिमान।।

(चै.च.अ. २०/२७,२८-३०)

स्वयं भगवान् श्रीचैतन्य महाप्रभुजी स्वतःला संसारी जीव मानत श्रीकृष्णाकडे शुद्ध-भक्तिची प्रार्थना करीत आहेत. अहो, प्रेमाचा स्वभावच असा असतो कि ज्यांचा या प्रेमाशी संबंध होऊन जातो, ते असे समजतात कि माझ्यात कृष्णभक्तिचा गंधदेखील नाही. अतः प्रेमाचे मूर्तिमान-विग्रह श्रीमन्महाप्रभूजी म्हणतात- मी धन, जन वा सुंदरी कविता काहीसुद्धा मागत नाही. हे करुणामय श्रीकृष्ण! मला तर आपण अहैतुकी कृपा करुन केवळ आपली शुद्धा भक्तिच प्रदान करा. मी पुन्हा पुन्हा दीनतापूर्वक श्रीचरणी दास्यभक्तिचे दानच मागतो आहे.।।४।।

## कीर्तनपद

प्रभू! पद युगे मोर निवेदन।
नाहि माँगि देहसुख-विद्या धन जन।।

नाहि माँगि स्वर्ग आर मोक्ष नाहि माँगि।
ना करि प्रार्थना कोन विभूतिर लागि।।

निज कर्मगुण दोषे जे जे जन्म पाई।
जन्मे जन्मे जेन तव नाम गुण गाइ।।

एइ मात्र आशा मम तोमार चरणे।
अहैतुकी भक्ति हृदे जागे अनुक्षणे।।

विषये जे प्रीति एबे आछये आमार।
सेइ मत प्रीति हऊक चरणे तोमार।।

संपदे विपदे ताहा थाकुक समभावे।
दिने दिने वृद्धि हउक नामेर प्रभावे।।

पशु पक्षी हये थाकि स्वर्गे या निरये।
तव भक्ति रहु भक्तिविनोद-हृदये।।

- गीतावली

दयामय प्रभो! आपल्या श्रीचरणकमळी माझे विशेष निवेदन आहे. मी दैहिक सुख, विद्या, धन, जन, स्वर्ग वा मोक्ष यापैकी काहीच मागत नाही. मी आपल्याकडे कुठली विभूति अथवा सिद्धि देखील मागत नाही. आपल्या चांगल्या वाईट कर्मानुसार त्यांच्या फलस्वरुप मी ज्या ज्या योनिंत जन्म ग्रहण करीन, त्या-त्या जन्मी आपल्या मधूर नामांचे आणि गुणांचे गान करीत राहीन आणि माझ्या हृदयात निरंतर अहैतुकी भक्ति जागृत रहावी- आपल्या श्रीचरणकमळी माझी हीच एकमात्र प्रार्थना आहे. या समयी जड भोग विषयांमध्ये माझी जशी प्रीति आहे, अगदी तशीच ती आपल्या चरणकमलांच्या ठायी व्हावी. ही प्रीती सुखांत आणि दुःखांत समसमान राहो, उलट आपल्या श्रीनामांच्या कीर्त्तनाच्या प्रभावामुळे अनुदिन-निरंतर वृद्धिंगत होत राहो. पशु-पक्षांच्या योनिंमध्ये राहो, स्वर्गात अथवा नरकात कुठेही जन्म ग्रहण करु देत, या भक्तिविनोद दासाच्या हृदयात आपली अहैतुकी भक्ति सदासर्वदा विराजमान राहो।।४।।

भक्तसम्राट कुलशेखर देखील अशीच प्रार्थना करतात -

नास्था धर्मे न वसुनिचये नैव कामोपभोगे
यद्यद् भव्यं भवतु भगवन् पूर्वकर्मानुरुपम्।
एतत्प्रार्थ्यं मम बहुमतं जन्मजन्मांतरेऽपि
त्वत्पादाम्भोरुहयुगगता निश्चला भक्तिरस्तु।।

नाहं वंदे पदकमलयोर्द्वन्द्वमद्वन्द्वहेतो
कुंभीपाकं गुरुमपि हरे नारकं नापनेतुम्।
रम्यारामामृदुतनुलतानंदने नाभिरंतुं
भावे भावे हृदयभवने भावयेयं भवन्तम्।।

* * *

## साधकांचे स्वरुप काय आहे?

अयिनन्दतनुज किंकरं
पतितं मां विषमे भवाम्बुधौ।
कृपया तव पादपंकज-
स्थितधूलिसद्दशं विचिन्तय ।।५।।

**अन्वय-** अयि नंदतनुज (हे नंदनंदन!) विषमे भवाम्बुधौ (भयंकर भवसागरात) पतितं किंकरं मां कृपया (पडलेल्या आपल्या नित्यदासावर कृपा करुन) तव पादपंकजस्थितधुलिसद्दशं (आपल्या श्रीचरणकमलांशी संलग्न रजःकणांसमान अर्थात् सदा-सर्वदा आपल्या क्रीतदासरुपात) विचिंतय (समजा) ।।५।।

**अनुवाद-** हे नंदनंदन! स्वतःच्या कर्मफळांमुळे भयंकर भवसागरात पडलेल्या आपल्या या नित्यदासावर कृपा करुन आपल्या श्रीचरणकमळी संलग्न रजःकमांसमान सदा-सर्वदा आपल्या क्रीतदासरुपात ग्रहण करावे ।।५।।

**सन्मोदनभाष्यम्-** ननु किं संसारदुःखं............
परित्यज्येति ज्ञातव्यम्।।५।।

(pg-52 to pg-53)

## सन्मोदनभाष्याचा अनुवाद

हरिनाम-संकीर्त्तनकारी साधकांकरिता सांसारिक दुःखांची आलोचना करणे काय उचित आहे? अशा आशंकेच्या समाधानाकरिता श्रीगौरसुंदर उक्त 'अयिनंदतनुज' श्लोकाची अवतारणा करीत आहेत- हे नंदनंदन! वस्तुतः मी आपला नित्यकिंकर आहे, परंतू आता आपल्या कर्मदोषांमुळे या भीषण संसारसागरात पडलो आहे. काम, क्रोध, मत्सरता आदि ग्राह (मगरी) गिळंकृत करण्याकरिता तोंड उघडून उभ्या आहेत. दुराशा आणि दुश्चिंतांच्या तरंगावर यत्र-तत्र (ईकडे-तिकडे??) वहात खूपच पीडित होत आहे. येथे कुसंगरुप प्रबळ वायुच्या वहाण्याने मी अधिकच व्याकूळ होत आहे. अशा दशेत आपल्याशिवाय मला कुणाचाच आश्रय नाही. कर्म, ज्ञान, योग, तप आदि तृण-गुच्छांसमान यत्र-तत्र तरंगतांना तर दिसत आहेत, परंतू त्यांचा आश्रय/आधार घेऊन कुणी संसार-सागर पार करु शकतो का? हो, कधी-कधी असेही घडते कि संसार-सागरात बुडणारा माणूस, त्यांना पकडून, आपल्याबरोबर त्यांनाही घेऊन बुडतो. आता आपल्या कृपेशिवाय अन्य कुठलाही आश्रय असू शकत नाही. केवळ आपले नामच अशी एक दृढ नौका आहे, जिचा आधार घेऊन जीव संसारसिंधूस सहजच पार करु शकतो. हा सगळा विचार करुन मी श्रीगुरुंच्या चरणकमलांच्या अहैतुकी कृपेमुळे आपल्या श्रीनामरुपी सुदृढ नौकेचा आश्रय ग्रहण केला आहे. आपण शरणागतवत्सल आहात; या (अथवा माझ्यासारख्या??) निराश्रिताचे समस्त दोष क्षमा करुन मला आपल्या चरणकमलांशी संलग्न धूळीकणांसमान जाणा. असे जाणल्यास आपल्या चरणाशी संलग्न धूळीकणांप्रमाणे मी आपल्या चरणकमलांपासून कधीसुद्धा विलग होऊ शकणार नाही- उक्त श्लोकाचा हाच अर्थ आहे/ हेच तात्पर्य आहे. याद्वारे हेच सुविदित होते कि भक्ति-साधकास भोग आणि मोक्षाच्या कामनेचा संपूर्णपणे त्याग करायला हवा ।।५।।

# श्रीचैतन्यचरितामृत

तोमार नित्यदास मुँइ तोमा पासरिया।
पडियाछों भवार्णवे मायाबद्ध हया।।

कृपा करि कर मोरे पदधूलि सम।
तोमार सेवक करों तोमार सेवन।।

पुनः अति उत्कंठा दैन्य हैल उद्गम।
कृष्ण ठांइ मागे प्रेम नामसंकीर्त्तन।।

(चै.च.अ. २०/२१,३३,३४)

प्रभो! मी आपला नित्यदास आहे. दुर्भाग्यवश आपल्याला सोडून मायाबद्ध होऊन या अथांग भवसागरात बुडतो आहे. आपण कृपा करुन मला श्रीचरणकमळांची धूळ समजून ग्रहण करा. मी आपला सेवक बनून नित्यकाळ आपली सेवा करीन. असे म्हणता-म्हणता श्रीचैतन्यमहाप्रभुंच्या हृदयातील उत्कंठा अत्यंत वाढली, ते दीनतापूर्वक पुन्हा श्रीकृष्णाकडे नाम-संकीर्त्तनामधील प्रीती वाढावी म्हणून प्रार्थना करु लागले.

## कीर्त्तन-पद

अनादि करम फले, पडि भवार्णव जले,
तरिवारे ना देखि उपाय।
ए विषय-हलाहले, दिवानिशि हिया जले,
मन कभू सुख नाहि पाय।।

आशा-पाश शत-शत, क्लेश देय अविरत,

प्रवृत्ति उर्मिर ताहे खेला|
काम क्रोध आदि छय, बाटपाडे देय भय,
अवसान, हैल आसि बेला।।

ज्ञान कर्म ठग दुइ, मोरे प्रतारिया लइ,
अवशेषे फेले सिंधुजले।
ए हेन समये बंधु, तुमि कृष्ण कृपासिंधु,
कृपा करि तोल मोरे बले।।

पतित किंकरे धरि, पादपद्मधूलि करि,
देह भक्तिविनोदे आश्रय।
आमि तव नित्यदास, भुलिया मायार पाश,
बद्ध ह'ये आछि दयामय।।

-गीतावली

परम करुणामय कृष्ण! मी आपल्या अनादि कर्मांच्या फलस्वरुप अथाह (अथांग) भवसिंधुत बुडत आहे. यातून पार होण्याचा कोणताच उपाय दिसत नाही. विषयरुप हलाहल विषाने हृदय करपून चालले आहे, मन अत्यंत व्याकुळ होत आहे. नाना प्रकारच्या कामनांच्या रज्जुंनी जखडलेला मी निरंतर कष्ट आणि यातनाच झेलतो आहे. प्रवृत्तिरुपी लाटांचा मार खात इथे-तिथे वहात चाललो आहे. इकडे जीवनकाल संपत आला आहे, मृत्युही अगदी निकट आहे, तिकडे काम, क्रोध, लोभ आदि षड्वेगरुपी दस्युंशी झटापट होत आहे, कर्म आणि ज्ञानरुपी ठगांनी मला पुरते ठगले आहे आणि शेवटी अगाध समुद्रात फेकून दिले आहे. हे करुणासिंधो! अशा घोर विपत्तिच्या समयी आपणच माझे एकमात्र बंधू आहात! कृष्ण! आपण कृपापूर्वक माझा उद्धार करा, मी आपला नित्यदास आहे! आपले विस्मरण होऊन मायेच्या बंधनात जखडला गेलो आहे. म्या (या??) पतित किंकर

'भक्तिविनोदास' आपल्या श्रीचरणकमळांच्या धुळीरुपाचा आश्रय कृपया प्रदान करा.

* * *

## सिद्धिची बाह्यलक्षणे काय आहेत?

**नयनं गलदश्रुधारया**
**वदनं गद्गदरुद्धया गिरा।**
**पुलकैर्निचितं वपुः कदा**
**तव नामग्रहणे भविष्यति।।६।।**

**अन्वय-** (हे प्रभो!) तव नाम ग्रहणे (आपले नाम-संकीर्त्तन करते समयी) मम नयनं गलदश्रुधारया (माझे नयन अश्रुधारांनी) वदनं गद्गद्रुद्धया गिरा (माझे मुख गद्गद वाणीने) वपुः पुलकैः निचितं (आणि माझे शरीर-सर्वांग पुलकावलिंनी) कदा भविष्यति (केव्हा व्याप्त होणार?)।।६।।

**अनुवाद -** प्रभो! आपले नाम ग्रहण करते वेळी माझे नयन अश्रुधारांनी, माझे मुख गद्गद वाणीने आणि माझे शरीर पुलकावलिंनी कधी बरे व्याप्त होईल?।।६।।

## सन्मोदनभाष्याचा अनुवाद

पुर्वोक्त पाच श्लोकांमध्ये सर्वप्रथम श्रद्धा, त्यामुळे साधुसंग, त्यानंतर श्रवण, कीर्त्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आणि आत्मनिवेदनरुप नवधाभक्तिचे साधन, तत्पश्चात्, आत्म-स्वरुपाची उपलब्धि आणि त्यामुळे अविद्यारुप अनर्थाचा नाश, त्यानंतर क्रमशः

निष्ठा, रुचि, आसक्ति, आणि भाव यांचा उदय - अशा प्रकारे ह्लादिनी शक्तिची सारवृत्ति-स्वरुप भक्तिच्या सहाय्याने जीवाच्या स्वरुप-विकासरुप परमधर्माचा क्रमविकास दाखविला गेला आहे. भावदशेत भक्तिच्या शुद्धस्वरुपाचे अखंडत्व सिद्ध होते. 'भाव' या दशेस 'रति' असे सुद्धा म्हणतात. यास पूर्णविकसित भक्तिरुप प्रेमाचा अंकूर मानले गेले आहे. साधन दशेत साधित होणाऱ्या श्रवण-कीर्त्तन आदि भक्तिच्या अंगांमध्ये श्रीकृष्णनाम-संकीर्त्तन भावावस्थेत अत्यंत प्रबळ रुप धारण करते. त्यावेळी साधकाचे चित्त क्षुब्ध होण्याचे उपस्थित होऊनही अक्षुब्ध रहाणे म्हणजेच (-??) क्षान्ति, भक्ति अनुशीलनाशिवाय वृथा समय न जाऊ देणे - अव्यर्थ-कालत्व, विषयांप्रति विरक्ति, मानशून्यता, भगवत्प्राप्तिची दृढ आशारुप आशाबंध, भगवत्प्राप्तिची तीव्र उत्कंठा, नामकीर्त्तनात प्रबळ रुचि, भगवद्-गुणानुवाद श्रवण-कीर्त्तनात आसक्ति, भगवल्लीला स्थळांच्या ठायी प्रीति- हे नऊ प्रकारचे अनुभाव (लक्षण-समूह) प्रकटीत होतात. पुनः पुर्वोक्त साधन-भक्ति, भगवत्प्राप्तिची अभिलाषा (रुचि) या द्वारे चित्त द्रवीभूत झाल्यानंतर 'भावभक्ति' म्हणवली जाते. हा भाव-विशुद्धसत्वविशेषस्वरुप आणि प्रेमरुपी सूर्याच्या किरणतुल्य असतो. उपर्युक्त दोन्ही सिद्धांत-वाक्यांमुळे भावभक्ति अथवा रतिचे प्रेमांकुरत्व आणि प्रेम-परमाणुत्व सिद्ध होते. "प्रेमच प्रारंभिक दशेत 'भाव' म्हणवला (म्हटला??) जातो आणि त्या दशेत अश्रू पुलक आदि सात्विक विकारसमूह स्वल्पमात्रेत दृष्टीस पडतात. त्या दशेत भगवंताच्या चरणकमलांचे ध्यान करतांना हृदय द्रवित होऊन जाते, तथा डोळ्यातून अश्रुधारा प्रवाहित होऊ लागतात."- इत्यादी तंत्र आणि पुराणांच्या वचनांनुसार प्रेमदशेत जे अनुभाव आणि सात्विक विकारसमूह प्रबळ रुपात प्रकटित होतात, भावदशेत ते अनुभाव आणि सात्विक विकारच स्वल्प मात्रेत दृष्टिगोचर होतात. अंतःकरणातल्या भावांना प्रकट करणाऱ्या बाह्यविकारांना 'अनुभाव' म्हणतात, जसे नृत्य, विलुण्ठन (भूमीवर लोळणे), गायन, जोरजोरात ओरडणे, अंग मोडणे, हुंकार भरणे, जांभई

देणे, दीर्घश्वास, लोकापेक्षा-त्याग, लाळ टपकणे, जोरजोरात हसणे, चक्कर येणे आणि उचकी येणे.

सात्विक विकार आठ आहेत - स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभेद, कंप, वैवर्ण्य, अश्रू आणि प्रलय. यापैकी नृत्य, गीत, अश्रू, पुलक आणि स्वरभेद-भावदशेत विशेषरुपाने लक्षित होतात. शिक्षक-चूडामणि श्रीचैतन्य महाप्रभूजी या भावदशांना लक्ष्य साधून सांगत आहेत- हे कृष्ण! हे नंदनंदन! आपले नाम घेता घेता माझ्या नयनातून अश्रूधारा कधी बरे प्रवाहित होतील? स्वरभंग झाल्यामुळे माझा कंठ कधी गद्‌गद वाणींने रुद्ध होईल? आणि माझे शरीर पुलकावलींनी कधी व्याप्त होईल? नाथ! आपण माझ्यावर अशी कृपा करा की आपले नाम ग्रहण करतेसमयी हे लक्षणसमूह यथाशीघ्र माझ्यात उदित होतील ।।६।

## श्रीचैतन्यचरितामृत

प्रेमधन बिना व्यर्थ दरिद्र जीवन।
‘दास’ करि वेतन मोर प्रेमधन।।

(चै.च.अ. २०/३७)

प्रेमधनाविना दरिद्र जीवन व्यर्थ आहे. प्रभो! आपण मला सेवकरुपात ग्रहण करून मला वेतन स्वरुपात आपले प्रेमधन प्रदान करा ।।६।।

## कीर्त्तन-पद

अपराध फले मम, चित्त भेल वज्रसम,
तुया नामे ना लभे विकार।

हताश हइया हरि, तव नाम उच्च करि,
बड़ दुःखे डाकि बार बार।।

दीन दयामय करुणा निदान।
भाव बिंदु देइ राखह पराण।।

कबे तव नाम-उच्चारणे मोर।
नयने झरब दर दर लोर।।

गद्‌गद स्वर कंठ उपजब।
मुखे बोल आध-आध बहिराब।।

पुलके भरब शरीर हामार।
स्वेद-कंप-स्तंभ हबे बारबार।।

विवर्ण शरीरे हारायब ज्ञान।
नाम समाश्रये धरबूँ पराण।।

मिलब हमार किये ऐछे दिन।
रोवये भक्तिविनोद मतिहीन।।

-गीतावली

अपराधांमुळे माझे हृदय वज्रासमान कठोर झाले आहे. म्हणून तर आपले नाम ग्रहण करतांना ते जरासुद्धा द्रवित होत नाही. प्रभो! आता मी हताश होऊन दुःखाने अत्यंत कातर होऊन वारंवार आपल्याला पुकारित आहे. आपण करुणामय आहात, कृपा करून मला भावाचा एकच थेंब प्रदान करुन माझ्या व्याकुळ प्राणांची रक्षा करा. तो शुभदिन मला कधी प्राप्त होईल, ज्यावेळी आपले नामोच्चारण करता-करता माझ्या दोन्ही (??) डोळ्यांतून अश्रूधारा प्रवाहित होऊ लागतील? कंठ

अवरुद्ध होऊन मुखातून अस्फुट- अर्धेमुर्धे शब्द निघतील? माझे सारे शरीर पुलकित होऊन जाईल? मी घामाने लडबडून जाईन आणि सर्वांग कापू लागेल? प्रभो! माझे शरीर केव्हा स्तंभित होणार, ते केव्हा भावविव्हल होऊन विवर्ण होईल, आणि शेवटी मी मूर्छित केव्हा होणार? पुन्हा सचेत झाल्यावर केवळ आपल्याच नामांचा आधार घेऊन प्राण धारण करीन. हा मतिहीन भक्तिविनोद अशा प्रकारे रुदन (रोदन??) करीत-करीत म्हणतो आहे की कधी या अभाग्याचे असे दिवस येतील काय?

* * *

# सिद्धिचे अंतर्लक्षण काय आहे?

**युगायितं निमेषेण चक्षुषा प्रावृषायितम्।**
**शून्यायितं जगत् सर्व गोविंदविरहेण मे ।।७।।**

**अन्वय-** गोविंद-विरहेण (व्रजेद्रनंदन श्रीकृष्णाच्या विरहात) मे (माझा) निमेषेण (निमेषमात्र काळदेखील) युगायितं (युगासमान प्रतीत होतो) चक्षुषा प्रावृषायितं (जशी  ढगांतून वर्षा व्हावी तद्वत् माझ्या डोळ्यांतून अश्रुंची वर्षा होऊ लागते) सर्वं जगत् शून्यायितं (हा सगळा संसार मला शून्याप्रमाणे प्रतीत होतो)।।७।।

**अनुवाद -** हे सखी! गोविंदांच्या विरहात मला निमेषमात्र काळसुद्धा युगासमान प्रतीत होतो, माझ्या नेत्रातून मेघांतून पाऊस वर्षावा तद्वत् अश्रुंची वर्षा होऊ लागते आणि हा सगळा संसार मला शून्यासमान भासतो ।।७।।

सन्मोदनभाष्यम्- सा रतिरुपा भक्तिः......................
एव सर्वदा आस्वादनीयः ।।७।।

(pg-64 to pg-66)

## सन्मोदनभाष्याचा अनुवाद

पूर्व श्लोकांमध्ये वर्णिलेली रतिरुपा भक्ति स्वयं स्थायी भावाचे रुप धारण करुन विभाव, अनुभाव, सात्विक आणि व्यभिचारी- या भावसामग्रींसमवेत मिळून भक्तिरसात परिणत होते. त्या दशेमध्ये त्याचे अनुभाव आणि सात्विक विकारसमूह पूर्णरुपात लक्षित होतात. श्रीरुपगोस्वामी भक्तिरसामृतसिंधुमध्ये प्रेमाची परिभाषा निर्धारित करतांना सांगतात- जी भावभक्ति आपल्या प्रारंभिक दशेपेक्षाही अधिकतर रुपात चित्तास द्रवित करुन सुस्निग्ध बनविते, परमानंदाच्या उत्कर्षाची प्राप्ती करविते तथा श्रीकृष्णात प्रगाढ ममता उत्पन्न करविते. त्या प्रगाढ भावासच विद्वज्जन “प्रेम” असे म्हणतात. उक्त सिद्धांत वचनानुसार प्रबळ ममताजनित प्रगाढ भावमयी भक्तिलाच “प्रेम” समजावे. विषय आणि आश्रय यांच्या परस्पर पाच प्रकारच्या मुख्य संबंधांच्या भेदाने शांत, दास्य, सख्य, वात्सल्य आणि मधूर असे पाच मुख्य रस आणि गौण संबंध भेदाने हास्य, अद्भुत, करुण, वीर, रौद्र, भयानक आणि बिभत्स असे सात गौण रस होतात. मुख्य रसात मधूर रसच सर्वोत्तम आहे. तोच मधूररस क्रमशः प्रगाढ मग प्रगाढतर होत होत प्रेम, प्रणय, मान, स्नेह, राग, अनुराग, भाव आणि महाभावाच्या रुपांत परिणत होत जातो. ज्या प्रीतिमध्ये उल्हासाची मात्रा अधिक असते, अशा प्रीतियुक्त रतिला शांत रस म्हणतात. शांत रसात ब्रह्मनिष्ठा प्रधान, सर्वत्र (अन्य रसांप्रति) तुच्छबुद्धि आणि निरपेक्षता असते. अतिशय ममतेच्या अविर्भावामुळे समृद्ध प्रीतिरुप प्रेमालाच दास्यरस म्हणतात. दास्य रस उदित झाल्यावर प्रीति-भंग होण्याचे कुठलेही कारण उपस्थित झाल्यावर देखील ही प्रगाढतर प्रीति

थोडीसुद्धा प्रभावित होत नाही. आराध्याप्रति आणखीनच प्रगाढ विश्वासयुक्त प्रेमास प्रणय म्हटले जाते, हा प्रणय सख्यरसाचा प्राण आहे. याचा प्रादुर्भाव झाल्यावर संभ्रम आदि योग्यतेतदेखील त्याचा अभाव पहाता येतो. आपल्या परिपक्वावस्थेत प्रणयच अतिशय वर्ध्दित प्रीतिमुळे कुंटिल रुप धारण करुन एक विचित्र भावास प्राप्त होऊन "मान" म्हणविला जातो. मान झाल्यावर श्रीभगवानसुद्धा भक्ताच्या प्रणय-कोपाच्या प्रीतिमय भावास्वादनाकरीता भक्तास मनविण्यास बाध्य होऊन जातात. अत्यधिक रुपात चित्ताला द्रवित करणाऱ्या प्रगाढ प्रेमास स्नेह म्हणतात. स्नेह उत्पन्न झाल्यावर महाबाष्प आदि विकार लक्षित होतात. यात कृष्णदर्शनाची लालसा कधीच मिटत नाही तथा कृष्ण सर्व-सामर्थ्यवान असूनही "त्याचे काही अनिष्ट तर होणार नाही ना?"- अशी आशंका होऊ लागते. वात्सल्य रसात ही दोन लक्षणे पाहिली जातात.

अभिलाषात्मक स्नेहास 'राग' म्हणतात. 'राग' उत्पन्न झाल्यावर क्षणिक वियोग देखील असह्य होतो. मिलनात अत्यधिक दुःखसुद्धा सुखासमान भासते. वियोगात याच्या अगदी विरुद्ध स्थिती होऊन जाते. तोच राग आपल्या इष्ट विषयास नित्य नवीन रुपात अनुभावित करीत आणि स्वयं नवनवायमान होत-होत अनुरागाच्या रुपात परिणत होतो. अनुराग उत्पन्न झाल्यावर परस्पर वशीभूत होण्याचा भाव अत्यंत अधिक रुपात वृद्धिंगत होतो. कृष्णसंबंधी इतर प्राण्यांच्या रुपातदेखील जन्म घेण्याच्या लालसारुपी 'प्रेम-वैचित्र्याचा' प्रकाश होऊ लागतो, तथा वियोगातही स्वविषय-स्वरुप कृष्णाची स्फुरणा विशेषरुपाने होऊ लागते. तोच अनुराग असमोर्ध्व चमत्कारितेने परिपूर्ण अशा उन्मादावस्थेस प्राप्त करतो तेव्हा 'महाभाव' म्हणविला जातो. महाभाव उदित झाल्यावर संयोगवश पापण्यांची होणारी उघडझापही असहनीय होऊन जाते तथा एका कल्पाचा काळसुद्धा क्षणभरासमान प्रतीत होतो. या विपरित वियोगात क्षणभाराचा काळही कल्पासमान भासतो.

महाभावाच्या संचारी आणि वियोग, अशा दोन्ही दशांमध्ये सात्त्विक आणि संचारी आदि सगळे विकार आपल्या चरमसीमेत उद्भासित होतात. अशा प्रकारे श्रीचैतन्यमहाप्रभुजींनी प्रीतिसंदर्भात प्रदर्शित प्रेमाचे, विशेषतः उन्नत-उज्ज्वल मधूर प्रेमरसाच्या क्रम-विकासाचे सार संक्षिप्त स्वरुपात या एकाच श्लोकात घागरीत सागर सामावल्याप्रमाणे भरुन ठेवले आहे.

'युगायितम्'- हे पद्य सरल आणि सुगम आहे. 'गोविंद विरहेण'- या वाक्याद्वारे विप्रलंभ अर्थात् वियोगाचा भाव प्रकट होतो. रसिक विद्वानांनी विप्रलंभास पूर्वराग, मान आणि प्रवास भेदांमुळे अनेक प्रकारचा विषद केलाय. तरीही श्रीचैतन्यमहाप्रभुंच्या या श्लोकात हे गुढ रहस्य अंतर्निहित आहे की प्रपंचांतर्गत साधक जीवांकरिता केवळ पूर्वरागयुक्त विप्रलंभाचेच आस्वादन करणे उचित आहे ।।७।।

विरहावस्थेच्या या दहा दशा सांगितल्या गेल्या आहेत - चिंता, जागरण, उद्वेग, तनू क्षीण होणे, मलिनांगता, प्रलाप, व्याधी, उन्माद, मोह आणि मृत्यू (मूर्च्छा).

## श्रीचैतन्यचरितामृत

उद्वेग दिवस ना जाय, क्षण हैल युगसम।
वर्षार मेघप्राय अश्रू वर्षे नयन।।

गोविंद विरहे शून्य हइल त्रिभुवन।
तृषानले पोडे-जेन ना जाय जीवन।।

(चै. च. अ. २०/४०-४१)

श्रीचैतन्यमहाप्रभू महाभावात विभोर होऊन विरहावस्थेत म्हणत आहेत-
सखी श्रीनंदनंदनाविणा (विना??), उद्वेगामुळे माझे दिवस सरत नाही; एक-एक क्षणाचा समयसुद्धा एकेका युगासमान प्रतीत होतोय. जशी

मेघांतून वर्षा होते, तशी माझ्या नयनातून निरंतर अश्रुंची वर्षा होते आहे. गोविंदांचा विरह आता सहन होत नाही. सारा संसार शून्यासमान भासतोय, या तुषानल रुपी विरहाग्निमध्ये सदा-सर्वदा शरीर पोळतय, परंतू तरीही प्राण काही जात नाही. आता मी काय करु?

(किर्त्तनपद (क) to कीर्त्तनपद (घ) - pg-70 to pg-72) कीर्त्तनपद (क)चा अनुवाद-

**(क)**

श्रीकृष्णनाम कीर्त्तन करता करता माझी अत्यंत अद्भुत दशा झाली आहे. माझ्या हृदयात हे स्फुरित होऊ लागले आहे कि मी कृष्णाचा नित्यदास आहे. मी कृष्णापासून विमुख होऊन मायेच्या विकट बंधनात जखडून जाऊन या जड जगतात नाना प्रकारचे दुःखकष्ट झेलत आहे. आता मला हा संसार जरासुद्धा प्रिय वाटत नाही. आता मी कुठे जाऊ, काय करु मला कृष्ण कुठे भेटतील? त्यांचे दर्शन झाल्याखेरीज चैन पडणार नाही- ही एक विशाल चिंता लागून राहीली आहे, जसे काही श्रावणात मेघ बरसत आहेत. पापण्यांची उघडझाप होण्याचा काळदेखील शेकडो युगांसमान प्रतीत होतोय. सखि! आता मात्र हा गोविंद विरह सहन होत नाही.

**(ख)**

आता तर हा समस्त संसार शून्यसम भासतो, प्राण उदास होत आहेत; कुठे जाऊ? काय करु? काहीच निश्चित करु शकत नाही. येथे प्राण जाऊ पहात आहेत. व्रजवासिंनो! जरा श्रीराधानाथाचे दर्शन करवून माझ्या जीवनाची रक्षा करा. भक्तिविनोदाची प्रार्थना ऐकून त्यालाही आपल्याबरोबर घ्या, नाही तर आता कृष्णविरह अधिक सहन न झाल्यामुळे कदाचित चार दिवसांतच माझे प्राण जातील.

**(ग)**

अहा! जेव्हा मी श्रीगोविंद नामाचे उच्चस्वराने कीर्त्तन करु लागलो, तेव्हा शरीरात नाना प्रकारचे भाव उदित होऊ लागले. सहसा पाहिले, यमुनेचे सुंदर उपकुल (किनाऱ्याजवळचा प्रांत??), हिरवीकंच मनोरम कुंजवने, एका कदंब वृक्षाखाली श्रीवृषभानुनंदिनीसोबत (श्रीमती राधिकेसोबत) नटवर श्यामसुंदर त्रिभंग ललित भावात बासरी वाजवत आहेत. त्या अपूर्व युगल जोडीचे दर्शन करुन स्थिर राहू शकलो नाही, मूर्छित होऊन भूतलावर पडलो. कितीवेळ असाच पडून राहिलो कळले नाही. सचेतन झाल्यावर यत्रतत्र खूप शोधले, परंतू खूप चेष्टा करुनही त्यांचे दर्शन पुन्हा झाले नाही.

**(घ)**

आता तर संपूर्ण जगत शून्यासमान प्रतीत होत आहे; नयनांतून श्रावणाच्या वर्षाधारेगत अश्रुधारा प्रवाहित होऊ लागल्यात. सखि! माझे प्राण तडफडत आहेत. शेवटी प्राण धारण करु तरी कसे धारण करु? त्यांच्या विरहात क्षणमात्रसुद्धा शेकडो युगांसमान वाटू लागलेत. अत्यंत व्याकुळ होऊन श्रीभक्तिविनोद पुन्हा श्रीनाकीर्त्तन करीत-करीत जोरजोरात पुकारत आहे- “हे राधानाथ! हे कृष्णप्राणप्रिये!! आपण दर्शन देऊन माझ्या प्राणांची रक्षा करा. अन्यथा आता मी मरणारच आहे.”

* * *

# सिद्धिची निष्ठा

**आश्लिष्य वा पादरतां पिनष्टु मा-**
**मदार्शनान्मर्महतां करोतु वा।**
**यथा तथा वा विदधातु लंपटोटाका**
**मत्प्राणनाथस्तु स एव नापरः ।।८।।**

**अन्वय-** सः लंपटः (ते लंपट) पादरतां माम् (आपल्या पादसेवेत अनुरक्त म्या (या??) दासीस) आश्लिष्य (प्रगाढ आलिंगनाद्वारे आल्हादित करोत) वा पिनष्टु (अथवा पायाखाली तुडवोत) वा अदर्शनात् (किंवा दर्शन न देऊन विरहाने) मर्महतां करोतु (मर्माहत करुन पीडा पोहचवोत) यथा तथा विदधातु (वा जशी इच्छा होईल तसे करोत, इतकेच काय तर दुसऱ्या प्रियांसोबत रमण करोत) तु एव (तरीदेखील तेच) मत्प्राणनाथः (माझे प्राणनाथ आहेत) अपरः न (त्यांच्याअतिरिक्त दुसरे कोणीच नाही)।।८।।

**अनुवाद-** ते (कृष्ण) लंपट आपल्या सेवेत अनुरक्त या दासीला प्रगाढ आलिंगनाद्वारे आल्हादित करोत वा पायातळी तुडवून टाकोत अथवा आपले दर्शन न देऊन मला मार्मांतिक पीडा प्रदान करोत किंवा त्यांची जशी इच्छा आहे तसे करोत- इतकेच काय दुसऱ्या प्रियांसोबत माझ्या समोरच रमण करोत, तरीदेखील तेच माझे प्राणनाथ आहेत. त्यांच्याअतिरिक्त अन्य दुसरे कुणीही नाही ।।८।।

**सन्मोदनभाष्यम्-** प्रेमदशालब्धानां............... नाम भाष्यं संपूर्णम् ।।८।।
(pg-75 to pg-78)

## सन्मोदनभाष्याचा अनुवाद

प्रेमदशेत पोहोचल्यावर, जीवाची मनोवृत्ति कशी काय होते, याचा परिचय या श्लोकात दिला गेला आहे. तो लंपट-चूडामणि आपल्या पदसेवेत अनुरक्त या दासीस प्रगाढ आलिंगनाद्वारे आल्हादित करो, आपल्या पायतळी तुडवून टाकोत अथवा आपले दर्शन न देऊन मला मर्मांतिक पीडा प्रदान करोत, किंवा त्यांची जशी इच्छा असेल तसे करोत, इतकेच काय तर दुसऱ्या प्रियांसोबत माझ्याच समोर रमणही करोत, तरीदेखीलतेच माझे प्राणनाथ आहेत- त्यांच्या अतिरिक्त दुसरे कुणीच नाही. श्रीमद्भागवतातही अशाच कृष्णैकनिष्ठतेचे वैशिष्ट्य दाखविले गेले आहे- “जेव्हा मरणशील मनुष्य समस्त कर्मांचा परित्याग करुन मला

आत्मसमर्पण करतो, त्यावेळीस मीसुद्धा त्याचे काही विशेष कल्याण करण्याचा इच्छुक बनतो आणि मग मी त्याला अमृत-स्वरुप आपल्या प्रिय परिकरत्वाची प्राप्ति करवून देत असतो.” या लक्षणाने हेच ज्ञात होते की प्रेमदशेत श्रीकृष्णच भक्तांचे एकमात्र जीवन-धन आणि प्राण-स्वरुप होऊन जातात. त्या दशेत भक्त आणि भगवंताचा परस्पर आकर्षणरुप परमधर्म पूर्णरुपात प्रकाशित होऊन जातो. श्रीमद्भागवतात श्रीप्रल्हाद महाराज म्हणतात- "जसे चुंबकाकडे लोखंड स्वयं खेचले जाते, तसेच चक्रपाणि भगवंताच्या स्वच्छंद इच्छाशक्तिने माझे चित्त देखील संसारातून विरक्त होऊन त्यांच्याकडे आपोआप आकर्षिले जाते.” उक्त वचनांद्वारे या विचाराची पुष्टि होते कि अणु-चैतन्य जीव आणि विभु-चैतन्य श्रीकृष्ण यांच्यात परस्पर संबंधात्मक असा एक स्वाभाविक धर्म आहे. हा स्वाभाविक धर्म जीवांच्या बहिर्मुख दशेत लुप्तप्राय असतो. परंतू सौभाग्यवश जेव्हा जीवाचा स्वभाव निर्मळ होतो, तेव्हा जीव आणि कृष्ण यांच्यातील उभयनिष्ठ पूर्वसिद्ध स्वाभाविक धर्म पुन्हा प्रकटित होऊन जातो, ठीक त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे शुद्ध-निर्मळ लोखंड चुंबकाकडे स्वतः आकर्षित होते धर्माचे एकमात्र प्रयोजन त्या पूर्वसिद्ध स्वाभाविक धर्मासच प्रकट करणे आहे. या अतिरिक्त त्याचे दुसरे कोणतेच प्रयोजन नसते. अतः शुद्ध जीवांच्या प्रेमरुप धर्माच्या साधनेत कुठल्याही दुसऱ्या फळाच्या कामनेचा अभाव समजावा. कारण श्रीमद्भागवतात स्वयं कृष्णाने देखील असेच विषद केले आहे- "माझ्या प्रिय गोपींनो! तुम्ही माझ्याकरिता घर-संसाराच्या त्या सगळ्या बेड्या तोडून टाकल्यात, ज्यांना मोठे-मोठे ज्ञानी-योगी देखील तोडू शकत नाहीत. माझ्याशी तुमचे हे मीलन सर्वथा निर्मळ आणि निर्दोष आहे. जर मी अमर शरीराने- अमर जीवनाने अनंतकाळापर्यंत तुमचे प्रेम आणि त्यागाच्या उपकारांना फेडायची इच्छा केली तरीसुद्धा फेडू शकत नाही. मी जन्मजन्मांतरापर्यंत तुमचा ऋणी रहाणार आहे. तुम्ही आपल्या सौम्य स्वभावाने - प्रेमाने मला उऋण (ऋणमुक्त??) करु शकता. परंतू तरीही मी तर तुमचा ऋणीच राहील.”

भगवंताच्या या कथनाने हे सिद्ध होते की कृष्ण-प्रीतिच भक्त-प्रीतिचे फळ आहे अर्थात् भक्तजनांमध्ये स्वसुखाच्या कामनेचा सर्वथा अभाव असतो; ते स्वतः कृष्णांची सेवा करतात, त्याच्याशी प्रेम करतात, त्यांना भेटतात अथवा जे काहीही करतात- त्या सगळ्यांचे उद्देश अथवा फळ केवलमात्र कृष्ण-प्रीति हेच असते.

येथे अदर्शन हेतू 'मर्मांतिक पीडा' प्रदान करण्याविषयी जे सांगितले गेले आहे, ते सुद्धा यथार्थतः दुःखजनक नाही, तर परम सुखजनकच आहे.

हेच सांगण्याकरिता श्रीकृष्ण म्हणतात, "मत्प्रिय गोपिंनो! यात मुळीच संशय नाही की तुम्ही माझ्याकरिता लोकमर्यादा, वेदमार्ग आणि आपल्या आत्प-स्वकीयांनाही सोडून दिले, त्यांचा त्याग केला आहे. अशा स्थितीत तुमची मनोवृत्ति आणि कोठे जाऊ नये, आपल्या सौंदर्याची आणि सौभाग्याची चिंता करावी लागू नये, ती मनोवृत्ती माझ्या ठायीच रहावी-याकरिता परोक्ष रुपात तुमच्यावर प्रेम करता करताच मी लपून बसलो होतो. म्हणून तुम्ही माझ्या प्रेमात दोष काढू नका. तुम्ही सगळ्या मला अत्यंत प्रिय आहात आणि मी तुम्हाला प्रिय आहे." दुसरी गोष्ट अशी कि या श्लोकात 'आलिंगना' द्वारे आल्हादित करण्याविषयी जे म्हटले गेले आहे, त्यातदेखील स्वसुखाच्या कामनेचा गंधमात्रही नाही; त्याचे तात्पर्यसुद्धा केवळ कृष्ण-प्रीतीशीच निगडित आहे. अतः हे कथनही प्रेमास अनुकूल, सर्वथा सुंदर आणि सिद्धांत-संगतच आहे.

आता या शिक्षाष्टकाचे महात्म्य संक्षिप्त स्वरुपात सांगण्यात येत आहे. स्वरुपशक्तिस्वरुपा श्रीमती राधिकेच्या अलौकिक प्रणयाची महिमा कशी आहे? ती श्रीमती राधिका ज्याचे आस्वादन करते, ती माझी अद्भुत मधुरिमा कशी आहे? आणि माझ्या मधुरिमेच्या अनुभूतिने तिला कुठले अनिर्वचनीय सुख प्राप्त होते? या तीन लालसांच्या पूर्तिच्या अभिलाषेने आपल्या नित्यलीला पीठस्वरुप वैकुंठाच्या एका विशेष प्रकोष्ठात गोलोक नामक श्रीनवद्वीपधामात परमतत्व श्रीकृष्णच औदार्य-प्रचूर

भगवत्स्वरुपात- श्रीकृष्णचैतन्य महाप्रभुंच्या रुपात त्या तीन भावांच्या रसास्वादनाकरिता नित्य विभिन्न प्रकारच्या लीला करीत असतात. श्रीराधाभावद्युति- संवलित-तनू - ते श्रीकृष्णचंद्र श्रीकृष्णचैतन्य रुपात ब्रह्माच्या एका दिवसात केवळ एकदाच या ब्रह्मांडात आविर्भूत होतात. अगदी काही काळापूर्वी त्यांचा अविर्भाव पुण्यतोया भगवती भागीरथीच्या पुनीत तटी पश्चिम बंगालच्या नदीया जिल्हयांतर्गत श्रीवृंदावनापासून अभिन्न श्रीनवद्वीप-श्रीमायापुरात संवत् १५४२, सन् १४८६ ई. मध्ये चंद्रग्रहण आणि शनिवारी येणाऱ्या फाल्गुनी पौर्णिमेस सायंकाळी झाला होता. ग्रहणकाळ असल्यामुळे त्या वेळेस सारे नगर हरिनामसंकीर्तनाच्या मधूर ध्वनिने दुमदुमुन गेले होते. पित्याचे नाव पंडित जगन्नाथ मिश्र आणि मातेचे नाव श्रीमती शचीदेवी होते. बाल्यावस्थेत बालसुलभ चपळतेने आणि कधी-कधी परम चमत्कारपूर्ण अलौकिक लीलांनी, पौगंडावस्थेत विद्याविलासाने तथा किशोरावस्थेत शास्त्र-विधियुक्त विवाह करुन आदर्श गृहस्थ-धर्माचे पालन तसेच भक्ति-प्रचाराने गौडभूमिस परमानंदाने आप्लावित केले होते. तदनंतर श्रीमध्वसंप्रदायी परिव्राजक चुडामणि श्रीईश्वरपुरींकडून गय क्षेत्री दशाक्षर गोपाळमंत्राची दीक्षा ग्रहण करुन जीवांना शास्त्रोक्त लक्षणसंपन्न सद्गुरुच्या चरणाश्रय ग्रहणरुपी कर्त्तव्याची शिक्षा दिली. गयेहून परतल्यानंतर भक्तमंडळींसोबत श्रीहरिनाम-संकीर्तनाद्वारे भक्ति-सरिता प्रवाहित करुन समस्त गौडभूमिस निमज्जित केले. २४ वर्षाच्या अवस्थेत शांकर-संन्यासी श्रीकेशवभारतींकडून संन्यास ग्रहण करुन नेहमीसाठी गृहाचा त्याग केला. तदनंतर सहा वर्षांपर्यंत तीर्थ-भ्रमणाच्या निमित्ताने बंगाल, उडीशा, दक्षिण भारत, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश (मथुरा, वृंदावन, प्रयाग, काशी) आणि बिहार (कन्हाई नाट्यशाला, राजमहल) या प्रांतांची यात्रा करुन लाखो जीवांना श्रीनामप्रेम प्रदान करुन कृतार्थ केले. सर्वत्र शुद्ध भक्तिचा प्रचार केला तथा नाना प्रकारच्या शास्त्र-विरुद्ध मतवादिंच्या कुमतांचे खंडन करुन चतुर्विध वैष्णव-संप्रदायांच्या सिद्धांताचे सार-स्वरुप अचिंत्य भेदाभेद तत्वमूलक

स्वमताची स्थापना केली. त्यानंतर १८ वर्षांपर्यंत श्रीजगन्नाथपुरीमध्ये स्थिर निवास करुन स्वयं आपल्या नित्य सिद्धपरिकरांसोबत आपल्या तिन्ही लालसांची पूर्ती करण्याहेतू प्रेमास्वादन केले आणि प्रभावशाली शुद्धभक्ति प्रचारकांना पाठवून त्यांच्याद्वारे आपल्या विशुद्ध मताचा प्रचार करविला. अशा प्रकारे श्रीकृष्णप्रेमाच्या प्रवाहाने संपूर्ण भारतास आप्लावित केले. दरम्यान त्यांनी स्वरुप दामोदर, श्रीरायरामांनंद, श्रीप्रबोधानंद सरस्वती, श्रीरुप, श्री सनातन, श्रीरघुनाथदास, श्रीगोपालभट्ट, श्रीजीव, कविकर्णपूर आदि आपल्या सिद्ध परिकरांच्या हृदयात शक्ति-संचार करुन त्यांच्याद्वारे स्वमत पोषक अनेकानेक ग्रंथरत्नांची रचना करविली. याच गौरांगदेवांनी स्वयं भक्तिच्या समस्त सिद्धांतांनी परिपूर्ण "श्रीशिक्षाष्टकची" रचना करुन सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांना त्याची शिक्षा दिली. कधी-कधी आपले परम अंतरंग पार्षद श्रीस्वरुप दामोदर आणि श्रीरायरामानंद यांच्या समवेत एकांतात या "शिक्षाष्टकाचे" तात्पर्यामृत रसास्वादन करीत असत. हे प्रसंग श्रीचैतन्यचरितामृत आदि ग्रंथात विद्यमान आहेत.

अशा प्रकारे स्वयं भगवान श्रीगौरांगदेवांनी एकीकडे आपल्या आदर्श भक्तिमय गृहस्थ-लीलांद्वारे स्वधर्म परायण गृहस्थांना जिथे सद्गृहस्थाचरणाची शिकवण दिली आहे तिथेच दुसरीकडे आपल्या आदर्श त्यागमय परंतू उच्चतम भक्ति-रसमय संन्यासलीलांद्वारे संपूर्ण परिव्राजक मंडळींस (विरक्तजनांना) देखील शिकवण दिली आहे. या शिक्षाष्टकाचा महिमा अनंत आहे.

जे श्रद्धाळूगण, श्रीगौरांगदेवांच्या श्रीमुखपद्मविगलित या शिक्षाष्टकाचे भक्तिपूर्वक पठण करतात, ते श्रीगौरसुंदरच्या श्रीचरणकमलांचे मधु-आस्वादनाच्या लोभाने मुग्ध होऊन मुरारि श्रीकृष्णचंद्राच्या प्रेम-सरोवरात निमज्जित होतात. ४०१ गौराब्दात केदारनाथ भक्तिविनोद- माझ्याद्वारे श्रीशिक्षाष्टकाचे यह सन्मोदनभाष्य प्रणित झाले।।८।।

मधुररसाचे आस्वादन करणाऱ्या शुद्ध रसिक वैष्णवांकरिता हे शिक्षाष्टक संपूर्ण वेदांचे सार-स्वरुप आहे. हे स्वयं श्रीभगवंताच्या श्रीमुखारविंदातून विगलित झाल्या कारणाने महावाक्यस्वरुप देखील आहे. म्हणून सर्व भाग्यवान जनांना या शिक्षाष्टकास कण्ठभूषण बनवून प्रतिदिन नियमित रुपाने याचे पठन-पाठन आणि पूजन करावयास हवे.
श्रीश्री गौरपरिकर महावदान्य श्रीमत्सच्चिदानंद भक्तिविनोद ठाकूरकृत श्रीशिक्षाष्टकाच्या सन्मोदन भाष्याचा अनुवाद समाप्त।।

# श्रीचैतन्यचरितामृत

(अनुवाद)

सखि! मी तर श्रीकृष्ण चरणांची दासी आहे. ते रसिकशेखर सुखाचे सागर आहेत. ते प्रगाढ आलिंगनाद्वारे मला आल्हादित करोत अथवा पायातळी तुडवून टाकोत, माझ्यावर कृपा करून दर्शनाद्वारे सुखी करोत अथवा दर्शन न देऊन मर्मांतिक पीडा देवोत, माझ्या तनामनाच्या भावना भले ही न समजोत, तरीसुद्धा ते माझे प्राणनाथच आहेत. सखि! मी मनोमन हा निश्चय केलाय कि त्यांनी माझ्यावर प्रेम करावे अथवा मला सतवावे; माझे सौभाग्य प्रकट करुन अन्य रमणिंना सोडून माझ्या वशीभूत व्हावे - त्या रमणींच्या समोरच माझ्यासोबत विहार करुन त्यांना दुःखित करावे; किंवा वाटलेतर ते शठ, धृष्ट, कपटी आणि लंपटच का न बनोत, भले ते माझ्या समोरच मला चिडवण्याकरीता दुसऱ्या गोपरमणिंसोबत विहार करोत, तरीसुद्धा माझे प्राणनाथ तेच आहेत. मला आपल्या कष्टांची जरासुद्धा पर्वा नाही, सदासर्वदा तरीही मी त्यांच्या सुखाचीच कामना करते आहे. त्यांना सर्वप्रकारे सुखी ठेवणे हाच माझ्या जीवनाचा मूळ उद्देश आहे. जर मला दुःख देण्यात त्यांना आनंद लाभतो तर हे दुःखच माझ्याकरिता परम सुख आहे.

# कीर्त्तन-पद

**भावार्थ -** प्रिय सखींनो! मी माझ्या अंतरंगातल्या भावना कशा व्यक्त करु? जेव्हा मी भावविभोर स्थितीत असते, तेव्हा हठात्  (अचानक??) मला चित्तचोराचे दर्शन घडते; किंतु (परंतु) जशी मी सचेतन होऊन पाहू लागते, तसे ते लपून बसतात. शोधून सुद्धा कोठे दिसत नाही. त्यावेळेस दुःखाची सीमा नसते, शरीर थरथर कापू लागते, प्राण तडफडू लागतात. हाय! हाय! काय करु? ते जगद्‌बंधू आहेत. त्यांनी मला आपल्यासोबत घेवो (घ्यावे??), न घेवो, जिथे-तिथे, जसे-तसे ठेवावे, कसेही ठेवावे, तेच माझे प्राणनाथ आहेत. आपल्या दर्शनाने मला आनंदित करावे, सुखी करावे, आपल्या प्रणयपूर्ण मला मनवावे अथवा दर्शन न देऊन माझ्या हृदयास दग्ध करावे; मला आपल्या वियोगाने भले मारुन टाकावे, त्यांना ज्या प्रकारे सुख मिळेल तसेच करावे; मी सर्व काही सहज करीन. माझ्यासाठी सुख-दुःख समसमान आहे. बस, त्यांनी सुखी रहावे. संयोगात आणि वियोगातही भक्तिविनोदाचे तेच एकमात्र प्राणनाथ आहेत, अन्य कोणीही नाही.

**(ख)**

दिव्य वृंदावनाच्या कदंब-काननी अष्ट सखींनी परिवेष्टित होऊन योगपीठस्थित रत्नसिंहासनावर विश्वजनांचे चित्त-हरणकारी वंशीधारी श्रीनंदनंदन श्रीमती वृषभानुनंदिनी-समवेत विराजमान झालेले आहेत. या युगल जोडप्याचे श्रीचरणकमलच माझ्या जीवनाचे सर्वस्व आहे. मी या श्रीचरणीच आपल्या प्राणांना ओवाळून टाकले आहे. मी त्यांची पाल्यदासी आहे. त्यांची चरणसेवा करते. ते कधी माझ्या हातांना पकडून मधूर वाणीने तांबुल मागून खातात, कधी तर कौतुहलपूर्वक माझ्याकडून पुष्पमाळा (माळा??) घेऊन धारण करतात, कधी कधी कुठल्यातरी बहाण्याने कुठेही लपून बसतात. त्यांच्या मिलनातील आनंद आणि विरहातील यातना आदि सगळे काही मी समानच मानते. जीवनी आणि मरणी- सर्व काळी

श्रीराधाकृष्ण युगलच माझे प्राण आहेत. भक्तिविनोद त्यांच्याव्यतिरिक्त आणखी काहीही जाणत नाही. ते त्यांच्या प्राणप्रेष्ठ सखिंच्या श्रीचरणी पतित होऊन, बस एकमात्र हीच भिक्षा मागतात कि त्यांनी मला श्रीमती राधिकाजींच्या निजगणांमध्ये ठेऊन सदा-सर्वदा श्रीयुगल चरणांच्या सेवेत नियुक्त करावे.

आणि आता सरतेशेवटी श्रीराधापद-सेवा अभिलाषी हा अनुवादक श्रीचक्रवर्ती ठाकुरांच्या एका श्लोकास उद्धृत करुन श्रद्धाळू पाठकांच्या श्रीचरणी प्रणत होत आहे-

आराध्योभगवान् व्रजेशतनयस्तद्धाम वृंदावन
रम्या काचिदुपासना व्रजवधुवर्गेण या कल्पिता।
श्रीमद्भागवतं प्रमाणममलं प्रेमा पुमर्थो महान्
श्रीचैतन्यमहाप्रभोर्मतमिदं तत्रादरो नः पराः।।

# समाप्त

* * *